दैनिक
# जनता आवाज

## बँक ऑफ बडोदा डेटा डार्क-वेबवर लीक

**मुंबई :** बँक ऑफ बडोदाच्या ग्राहकांचा वैयक्तिक डेटा आणि बँकेची अंतर्गत कागदपत्रे डार्क वेबवर लीक झाली आहेत. या प्रकरणाशी संबंधित एका सूत्राने आणि सायबरसुरक्षा संशोधकाने ही माहिती दिली आहे. कॅशलेस कंझ्युमरचे संस्थापक आणि सायबरसुरक्षा संशोधक श्रीकांत एल यांच्या मते, लीक झालेल्या डेटामध्ये ग्राहकांचे वैयक्तिक तपशील, ओळखपत्रे, कर्जाशी संबंधित कागदपत्रे आणि बँकेचे अंतर्गत ऑडिट रेकॉर्ड समाविष्ट आहेत. या डेटा लीकची पुष्टी करताना प्रकरणाशी संबंधित सूत्राने सांगितले की, बँक ऑफ बडोदाने या घटनेच्या तपासासाठी फॉरेन्सिक ऑडिट सुरु केले आहे. तथापि, या लीकमुळे किती ग्राहक प्रभावित झाले आहेत, याची नेमकी संख्या अद्याप स्पष्ट झालेली नाही.

अहिल्यानगर | वर्ष ०३ रे | अंक १४९ वा | मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ | RNI No. MAHMAR/2022/85155 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

**आजचे हवामान**
कमाल 29°C | किमान 23°C

पेट्रोल 111.21 | डिझेल 97.83

सोने 1,43,658 | चांदी 2,22,735

# ‘युवकांच्या भविष्याशी खेळ’

## औषध निरीक्षक भरती परीक्षा पेपरफुटीचा आरोप; आ. पवारांचा प्रेझेंटेशनमधून कथित पेपरफुटीचा उलगडा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** नीट, टीईटी पेपरफुटीनंतर महाराष्ट्र आणखी एक पेपरफुटी झाल्याचा दावा काँग्रेससह शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने केला आहे. राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा पेपर फुटल्याचा दावा विरोधकांनी केला आहे. यामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली आहे. एमपीएससी औषध निरीक्षक भरती परीक्षा प्रश्नपत्रिका पेपर फुटी प्रकरणी आ. रोहित पवार यांनी खळबळजनक गौप्यस्फोट केला आहे. परिणामी नीट, टीईटी आणि आता एमपीएससी पेपरफुटीने युवकांच्या भविष्याशी खेळ सुरू असल्याची चर्चा देशभर सुरू असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

आ. पवार यांनी त्यांच्याकडे पुरावे असल्याचा सुद्धा दावा केला आहे. रोहित पवारांनी काल पत्रकार परिषद घेत एक प्रेझेंटेशन करुन त्यांनी हा पेपर कसा फुटला ते सर्व समजावून सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आ. पवार यांनी पेपरफुटीची संपूर्ण कार्यपद्धती समोर मांडली. त्यांनी केलेल्या दाव्यात म्हटले की, २२ मार्च रोजी औषध निरीक्षकपदाची परीक्षा होती. पण, नंदुरबारच्या कौटिल्य अकादमीतील काही विद्यार्थ्यांना २० मार्चलाच म्हणजेच दोन दिवस आधी परीक्षेतील ९० टक्के प्रश्न उपलब्ध झाल्याचा दावा केला.

### संशयितांचे मोबाईल फॉरेन्सिकसाठी जप्त

२२ मार्च रोजी पार पडलेल्या या परीक्षेचे प्रश्न २० मार्चलाच व्हॉट्सअॅप ग्रुप्सवर फिरत असल्याचे आरोप करण्यात आले आहेत. आ. रोहित पवार आणि शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी या प्रकरणी पत्रकार परिषद घेऊन सरकार आणि प्रशासनावर प्रश्नांची सरबत्ती केली. हा संपूर्ण प्रकार अहिल्यानगर येथील ऋषिकेश गांगर्डे आणि छत्रपती संभाजीनगर येथील अन्य एका विद्यार्थ्याने एपीएमसी व एफडीए प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला. धक्कादायक बाब म्हणजे, तक्रार केल्यानंतर छत्रपती संभाजीनगरच्या विद्यार्थ्याने आपली तक्रार अचानक मागे घेतली. मात्र, अहिल्यानगरचा तक्रारदार ऋषिकेश गांगर्डे आपल्या आरोपांवर ठाम असून, या घोटाळ्यातील संशयितांचे मोबाईल फॉरेन्सिक तपासासाठी जप्त करण्याची मागणी त्याने लावून धरली आहे.

पैसे दिल्यानंतर संबंधित व्यक्ती व्हॉट्सअॅपवर प्रश्न पाठवायचा. तसेच, २ ते ३ मिनिटांतच डिलीट फॉर ऑल करायचा. मात्र, एका विद्यार्थ्याने ते डाऊनलोड केलेले प्रश्न आपल्या मित्राला पाठवले, ज्यामुळे या गैरव्यवहाराचे डिजिटल पुरावे आता आपल्या हाती लागले आहेत, **(पान ४ वर)**




> एमपीएससीने या कथित पेपरफुटी प्रकरणाची अत्यंत गांभीर्याने दखल घेतली आहे. प्राप्त पुरावे, तक्रारी आणि निवेदनांची सखोल पडताळणी केली जात आहे. तपासाअंती या प्रकरणी संबंधितांविरोधात पोलिसांत रीतसर फिर्याद दाखल केली जाईल.
>
> **– महेंद्र हरपाळकर, सचिव : महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

## संमिश्र

### अमेरिकेकडे शस्त्रांची कमतरता नाही

**वॉशिंग्टन डीसी :** डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत युद्ध सुरू असले तरी अमेरिकेकडे शस्त्रास्त्रांचा कोणताही तुटवडा नसल्याचे ठणकावून सांगितले आहे. आमच्याकडे जगात सर्वाधिक शस्त्रे आहेत. आमच्या गरजेपेक्षाही जास्त, असे ते म्हणालेत. इराणसोबत सुरू असलेल्या संघर्षामुळे अमेरिकेकडील पॅट्रियट इंटरसेप्टर क्षेपणास्त्रांचा साठा कमी होत असल्याच्या माध्यमांतील वृत्तांनंतर ट्रम्प यांनी हे विधान केले आहे. या विधानानंतर लगेचच, ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रुथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एआय-निर्मित अनेक प्रतिमा शेअर केल्या. एका प्रतिमेत खारग बेटावरील हवाई हल्ला दाखवण्यात आला होता.

### मी स्ट्रीट फायटर : धर्मेंद्र प्रधान

**नवी दिल्ली :** शिक्षण मंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर सोमवारी धर्मेंद्र प्रधान संसदेत पोहोचले. ते येताच भाजप आणि एनडीए खासदारांची गर्दी त्यांचे स्वागत करण्यासाठी पोहोचली. सत्तापक्षाव्यतिरिक्त विरोधी पक्षाचे लोकही टिप्पणी करण्यासाठी त्यांना भेटायला पोहोचले होते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, जेव्हा विरोधी खासदार त्यांना भेटत होते, तेव्हा एका खासदाराने टोमणा मारत म्हटले – हे पहिल्यांदाच घडले आहे की एखाद्या मंत्र्याने कोणत्याही आरोपाचा सामना न करता राजीनामा दिला आहे. यानंतर लगेचच काँग्रेस खासदार जयराम रमेश यांनीही उपहासाने म्हटले – असे होतच असते. यावर पलटवार करत धर्मेंद्र प्रधान म्हणाले, ‘‘मी स्ट्रीट फायटर आहे, एसी खोल्यांमध्ये बसणारा कार्यकर्ता नाही.’’

### भारत-नेपाळ सीमेवर धार्मिक तणाव

**मुंबई :** भारत-नेपाळ सीमेला लागून असलेल्या नेपाळच्या सुनसरी जिल्ह्यात रविवारी रात्री दोन धार्मिक समुदायांमध्ये संघर्ष झाला. परिस्थिती बिघडल्यावर पोलिसांनी गोळीबार केला, ज्यात २४ वर्षीय ओम प्रकाश मेहता यांचा मृत्यू झाला. डझनहून अधिक लोक जखमी झाले आहेत. यात सुरक्षा कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा संघर्ष देवगंज ग्रामीण नगरपालिकेच्या कप्तानगंज परिसरात झाला. दोन्ही समुदाय तिथे वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम करत होते. याच दरम्यान लाऊडस्पीकर वाजवण्यावरून आणि धार्मिक झेंडे लावण्यावरून वाद झाला. बघता बघता या प्रकरणाने हिंसक रूप धारण केले.




## शेतकऱ्यांचे नुकसान करणारा निर्णय अमान्य

### राहुरी तालुक्यातील उंबरे येथील बैठकीत आ. प्राजक्त तनपुरे ठाम



> रेल्वे प्रकल्प उभारणीसाठी आपल्या परिसरात कोणत्याही शेतकऱ्यांनी रेल्वे लाईन उभारण्यासाठी लागणारे सामान ठेवण्यासाठी ठेकेदारास आपल्या जागा शेती कोणत्याही आर्थिक स्वरूपात देऊ नये. तसेच शेतकऱ्यांनी प्रत्येक ठिकाणी माझ्या पाठीशी उभे रहा. ज्यावेळी जेलमध्ये जायची वेळ त्यावेळी सर्वात आधी पुढे प्राजक्त तनपुरे राहिलं. एखादा मोठा उद्योग आला असता तर आम्ही विरोध केला नसता पण शेतकऱ्यांच्या बागायती जमिनी उद्ध्वस्त करू यासाठी रेल्वे कृती समितीचे नेतृत्व करणार आहे.
>
> **– प्राजक्त तनपुरे, आमदार**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** राहुरी- शनिशिंगणापूर प्रस्तावित रेल्वेमार्गामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित होणार असून, काहींच्या शेतीचे दोन तुकडे होणार आहेत. या परिसरात कोणतीही मोठी औद्योगिक वसाहत किंवा रोजगारनिर्मितीचा प्रकल्प नसताना केवळ रेल्वेमार्गासाठी सुपीक शेतीचे नुकसान करणे योग्य ठरणार नाही. विकासासाठी आवश्यक आणि लोकहिताचा प्रकल्प असता, तर त्याला विरोध केला नसता. मात्र शेतकऱ्यांचे नुकसान करणारा कोणताही निर्णय स्वीकारला जाणार नाही, अशी ठाम भूमिका आ. प्राजक्त तनपुरे यांनी घेतली आहे. **(पान ४ वर)**

## रुग्णवाहिका नाकारल्यानेच मृत्यू

### दोषींवर गुन्हा दाखल करण्याची खा. लंकेंची मागणी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** लोणीव्यंकनाथ येथील आनंदी अनिल कांडेकर व विरा प्रविण कांडेकर या दोन चिमुरड्यांना वेळेत रुग्णवाहिका उपलब्ध करून न दिल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप करत संबंधित वैद्यकीय अधिकारी आणि अन्य जबाबदार व्यक्तींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी केली आहे. याबाबत त्यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार अर्ज दिला आहे.

खा. लंके यांनी लोणीव्यंकनाथ येथे जाऊन कांडेकर कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर त्यांनी थेट श्रीगोंदा पोलीस ठाणे गाठून वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत मुळे, डॉ. शैला डांगे तसेच या प्रकरणातील इतर जबाबदार **(पान ४ वर)**

## प्रवरा मातेचे खण-नारळाने पूजन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** अलनिनोच्या भीतीमुळे यावर्षी नागरिकांमध्ये मोठी चिंता होती. मात्र ईश्वराच्या कृपेने जुलै महिन्यामध्ये भंडारदरा व निळवंडे धरण पूर्ण भरून प्रवरा नदी दुथडी वाहत आहे. या आनंदाचे महाराष्ट्राचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेरकरांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले असून संगमनेरमधील महिलांनी प्रवरा नदीची खण-नारळाने ओटी भरून तिची पूजा केली. याचबरोबर सर्व नागरिकांच्या जीवनात आनंद निर्माण करणाऱ्या या अमृतवाहिनीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

गंगामाई घाट येथे माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, शहराध्यक्ष प्रमिला अभंग, नगरसेविका सीमा खटाटे, सरोजना पगडाल, दिपाली पांचारिया, नंदा गरुडकर, ज्योती अभंग, कलंत्री भावी, डॉ. अनुराधा सातपुते, नगरसेवक मुजीब खान लाला पठाण, भारत बोराडे, सौरभ कासार, बाळासाहेब कानवडे, मुकुंद गरुडकर, संजय पगडाल, अलोक बर्डे, अंबादास आडेप यांच्यासह विविध कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी सर्व महिलांनी प्रवरा नदीची पूजा करून खण-नारळाने ओटी भरली. याचबरोबर नदीने आपल्या जीवनात आनंद निर्माण केल्याबद्दल तिच्या प्रतिकृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, प्रवरा अमृतवाहिनी ही रतनवाडी येथील अमृतेश्वर **(पान ४ वर)**

## श्रीरामपुरात प्रेमविवाहाचा हायव्होल्टेज ड्रामा

### आईने बोनेटवर बसून अडविली गाडी; सज्ञान जोडपे पोलिसांच्या ताब्यात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** पळून जाऊन प्रेमविवाह केलेल्या सज्ञान मुलीला अडवण्यासाठी तिच्या आईने थेट चालत्या कारच्या बोनेटवर बसून गाडी थांबवण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना काल, सोमवारी सकाळी श्रीरामपूर शहरात घडली. या प्रकारामुळे कर्मवीर चौक ते सय्यदबाबा चौक परिसरात मोठी खळबळ उडाली.

माहितीनुसार, श्रीरामपूर तालुक्यातील एका तरुणीने राहुरी तालुक्यातील एका तरुणासोबत काही दिवसांपूर्वी पळून जाऊन विवाह केला होता. त्यानंतर मुलीच्या कुटुंबीयांनी श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती.

ही तक्रार मागे घेण्यासाठी तरुणी व तिचा पती काल, सोमवारी सकाळी श्रीरामपूरला येणार असल्याची माहिती मुलीच्या नातेवाईकांना मिळाली. त्यामुळे ते पोलिस ठाण्याबाहेर थांबले होते. दरम्यान, हे जोडपे स्विफ्ट कारमधून येताच नातेवाईकांनी वाहन अडवण्याचा प्रयत्न केला.

मात्र, कार न थांबल्याने संतप्त झालेल्या तरुणीच्या आईने थेट कारच्या बोनेटवर बसून हातातील चप्पल काचांवर व बोनेटवर मारत वाहन थांबवण्याचा प्रयत्न केला. तरीही कार पुढे जात **(पान ४ वर)**



### पोलिस ठाण्यात प्रेमविवाहाची कबुली

पोलिस ठाण्यात चौकशीदरम्यान संबंधित तरुण-तरुणीने परस्पर संमतीने विवाह केल्याचे स्पष्ट झाले. दोघेही कायदेशीरदृष्ट्या सज्ञान असल्याची माहिती पोलिस निरीक्षक विशाल खैरे यांनी दिली. त्यानंतर पोलिसांनी दोन्ही कुटुंबीयांसह तरुण व तरुणी यांचे समुपदेशन करत परस्पर चर्चा घडवून आणली. प्रकरणावर तोडगा काढण्यासाठी उशिरापर्यंत पोलिस ठाण्यात समेटाचे प्रयत्न सुरू होते.

## विकासकामे वेळेत अन् दर्जेदार पूर्ण करा

### डॉ. सुजय विखेंच्या अधिकाऱ्यांना सूचना; सावळी विहीर खुर्दच्या विकासकामांची पाहणी



### दर्जेदार कामाचे डॉ. विखेंचे आदेश

बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर दर्जेदार साहित्याचा वापर झाला पाहिजे, कोणत्याही परिस्थितीत गुणवत्तेशी तडजोड होता कामा नये, प्रत्येक काम तांत्रिक निकषांनुसार आणि नियोजित वेळेत पूर्ण झाले पाहिजे. पाहणीदरम्यान काही ठिकाणी आवश्यक सुधारणा सुचवत त्या तातडीने पूर्ण करण्याचे कराव्यात. भविष्यात हजारो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्याशी संबंधित असलेल्या या प्रकल्पात प्रत्येक बाब उच्च दर्जाची असणे आवश्यक असल्याचे डॉ. सुजय विखे पाटील यांनी अधोरेखित केले.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सावळी विहीर खुर्द :** सावळी विहीर खुर्द येथे सुरू असलेल्या शैक्षणिक, औद्योगिक आणि पायाभूत विकासकामांना अधिक गती देण्याच्या उद्देशाने भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी काल, सोमवारी विविध महत्त्वाच्या प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली.

राज्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीपासून ते एमआयडीसी परिसरातील रस्ते, गटार, पाणीपुरवठा, पंपिंग स्टेशन, बांधकाम सुरू असलेल्या आयटीआय महाविद्यालयाच्या इमारतीची पाहणी तसेच अन्य मूलभूत सुविधांपर्यंत प्रत्येक कामाचा त्यांनी बारकाईने आढावा घेतला. यावेळी संबंधित अधिकारी, अभियंते, ठेकेदार,आणि ग्रामस्थांसमवेत विकासकामांबाबत विस्तृत चर्चा करत कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सर्वप्रथम डॉ. सुजय विखे पाटील यांनी सावळी विहीर खुर्द येथे उभारण्यात येत असलेल्या राज्यातील महत्त्वाकांक्षी पशुवैद्यकीय **(पान ४ वर)**

## १५ वर्षीय अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील मुसळवाडी परिसरातील महाडुक सेंटर येथे १५ वर्षीय अल्पवयीन मुलीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना काल, सोमवारी सकाळी उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, साक्षी किशोर बर्डे (वय १५ वर्षे ३ महिने) हिने राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपविले. कुटुंबीयांच्या निदर्शनास ही घटना येताच त्यांनी आरडाओरडा केला. त्यानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.



यावेळी घटनेची माहिती कुटुंबीयांनी तत्काळ राहुरी पोलिस ठाण्याशी संपर्क साधून दिली. घटनास्थळी राहुरी पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार जयदीप बडे आणि शेषराव कुटे यांनी धाव घेतली. रुग्णवाहिका चालक रविंद्र देवगिरे यांच्या मदतीने मुलीला **(पान ४ वर)**

# आरोग्यसेवेतून जपली सामाजिक बांधिलकी

## आ. जगताप; श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्रात पॅथॉलॉजी लॅब मशिनरीचे लोकार्पण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** समाजाचे काहीतरी देणे लागते या भावनेतून गेल्या ३६ वर्षांपासून श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्र, स्वर्गीय बसंताबाई शिवलालजी गांधी चिकित्सालयाच्या माध्यमातून सर्वसामान्य व गरजू रुग्णांना अल्प दरात आरोग्यसेवा उपलब्ध करून सामाजिक बांधिलकी जपली जात आहे. स्वर्गीय शिवलालजी गांधी यांच्या प्रेरणेतून सुरू केलेल्या सेवाभावी कार्याचा वारसा गांधी परिवार अत्यंत समर्पितपणे पुढे नेत असून ही समाजासाठी अभिमानास्पद बाब असल्याचे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगर येथील श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्र, स्वर्गीय बसंताबाई शिवलालजी गांधी चिकित्सालय यांच्या वतीने आयोजित अत्याधुनिक एक्स-रे व पॅथॉलॉजी लॅब मशिनरी



लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी आ. संग्राम जगताप, अण्णासाहेब मुनोत, उद्योजक संतोष बोथरा, सतीश लोढा, सीए अजय गांधी, ॲड. अशोक गांधी, मर्चंट बँकेचे चेअरमन संजय चोपडा, नगरसेविका मीनाताई चोपडा, माजी महापौर भगवान फुलसौंदर, सीए रवींद्र कटारिया, नरेंद्र बाफना, सागर गांधी, शरद मुनोत, पुष्पाताई गांधी, राखी गांधी, चैताली गांधी, संजय गुगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

आ. संग्राम जगताप म्हणाले की, चांगल्या विचारातूनच समाजाला आधार मिळतो. कोणत्याही आजाराचे योग्य वेळी निदान होऊन त्यावर तातडीने उपचार होणे अत्यंत गरजेचे असते. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक सर्वसामान्य कुटुंब आजारांकडे दुर्लक्ष करतात. मात्र अशा रुग्णांना अल्प दरात दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे मोलाचे कार्य श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्र करत आहे.

सागर गांधी म्हणाले की, श्री तिलोक आनंद मानव सेवा केंद्राच्या माध्यमातून गेली ३६ वर्षे गरजू रुग्णांना अल्प दरात आरोग्यसेवा दिली जात आहे. रुग्णांच्या आजारांचे तातडीने व अचूक निदान व्हावे यासाठी एक्स-रे व पॅथॉलॉजी लॅबच्या माध्यमातून तपासण्या केल्या जातात, ज्यामुळे डॉक्टरांना योग्य वेळी उपचार सुरू करणे शक्य होते.

> बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात वैद्यकीय क्षेत्रात मोठी प्रगती झाली असून रुग्णांना अधिक अचूक व दर्जेदार तपासणी सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने गांधी परिवाराच्या वतीने अत्याधुनिक एक्स-रे व पॅथॉलॉजी लॅब मशिनरी उपलब्ध करून देण्यात आली आहे. अत्याधुनिक एक्स-रे व पॅथॉलॉजी लॅब मशिनरीमुळे आजारांचे अचूक निदान होऊन योग्य वेळी उपचार करता येतील व अनेक गंभीर आजार टाळणे शक्य होईल.
>
> **– संग्राम जगताप, आमदार**

या केंद्रातील आरोग्य सेवेचा दररोज सुमारे ५०० रुग्ण लाभ घेतात. केंद्रातील पूर्वीची एक्स-रे व पॅथॉलॉजी लॅब मशिनरी जुनी झाल्याने आता अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवीन मशिनरी गांधी परिवाराने उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे तपासण्यांमध्ये अधिक अचूकता, वेग आणि विश्वासार्हता मिळणार असून रुग्णांना अधिक दर्जेदार सेवा उपलब्ध होईल.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी स्वर्गीय शिवलालजी व गोकुळजी गांधी यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव करत गांधी परिवाराच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांमुळे सर्वसामान्य रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून समाजोपयोगी आरोग्यसेवेची परंपरा अधिक सक्षमपणे पुढे सुरू राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



# टाळ-मृदुगाच्या गजरात विद्यार्थ्यांची दिंडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, वडाळा महादेव येथे आषाढी एकादशीनिमित्त शुक्रवारी अत्यंत भक्तिमय वातावरणात पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. दिंडीसोबत ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी आणि वृक्षारोपण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना अध्यात्माबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

मुख्याध्यापक बाळासाहेब कसार यांच्या हस्ते पालखीतील श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर विठ्ठल विठ्ठल नामघोष, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि झांज पथकाच्या नेतृत्वाखाली दिंडी उत्साहात मार्गस्थ झाली.

विद्यालय परिसरात गावातील मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सरपंच सचिन पवार, कृष्णा पवार, दादा पवार, भरत पवार, संतोष कसार, राहुल राऊत, अरुण पवार, सोमनाथ कसार, सुरेश पवार, पंकज पवार, बापू पवार, गजेंद्र कसार आणि जालिंदर विटेकर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान ज्येष्ठ शिक्षिका साधना वाघमारे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ज्येष्ठ शिक्षक ज्ञानेश्वर केदार यांच्यासह शीतल निंभोरे, स्वेजल रसाळ, उषा नाईक, प्रज्ञा कसार, भास्कर सदगीर, दीपाली बच्छाव, ज्योती थोरात, सुहास पांडे, प्रशांत बांडे, सौरभ गायधने आणि भास्कर शिंगटे आदी शिक्षक उपस्थित होते.

# वडिलांच्या स्मृतीतून शिक्षणाला बळ

## कौठाळे परिवाराकडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना ज्ञानदेव आनंदा कौठाळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ कौठाळे परिवाराच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत सलग तिसऱ्या वर्षी हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी सुमारे २५ हजार किमतीच्या वह्या, शालेय बॅग आणि गणवेशाचे विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले. तसेच माजी मुख्याध्यापक आनंदराव वेताळ यांनी आठ विद्यार्थिनींना शालेय गणवेश भेट देऊन उपक्रमात सहभाग नोंदविला.

कै. ज्ञानदेव कौठाळे यांच्या निधनानंतर आई शैला कौठाळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्या गुंड, ज्योती गाडगे, सारिका कोकणे आणि अक्षय कौठाळे यांनी अनेक आर्थिक अडचणींवर मात करत उच्च शिक्षण पूर्ण केले. आज स्वतःच्या पायावर उभे राहिल्यानंतर त्याच संघर्षाची जाणीव ठेवून त्यांनी गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे केला आहे.

कार्यक्रमाची सुरुवात संदीप वेताळ यांच्या ईशस्तवनाने झाली. प्रास्ताविकात धर्मराज गुंड यांनी उपक्रमामागील उद्देश स्पष्ट केला. पर्यवेक्षक नामदेव डुंबरे यांनी या उपक्रमाचे कौतुक करत प्रशालेच्या वतीने कौठाळे परिवाराचे आभार मानले.

> वडिलांच्या निधनानंतर शिक्षण घेताना आम्हालाही अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. त्या संघर्षातून पुढे येत आज आम्ही समाजातील गरजू विद्यार्थ्यांना मदत करू शकलो, याचे समाधान वाटते.
>
> **– विद्या कौठाळे-गुंड**

> कै. ज्ञानदेव कौठाळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ कौठाळे परिवाराने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत केली. तसेच माजी मुख्याध्यापक आनंदराव वेताळ यांनीही विद्यार्थिनींना गणवेश दिले. हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी आणि कौतुकास्पद आहे.
>
> **– पी. जे. मेरगळ, प्राचार्य**

यावेळी पर्यवेक्षक नामदेव डुंबरे, संदीप वेताळ, धर्मराज गुंड, विद्या गुंड, अक्षय कौठाळे, किरण कोकणे, सारिका कोकणे, शैला कौठाळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप घावटे यांनी केले.

# सुसाईड नोट लिहून विद्यार्थिनीची आत्महत्या

## डॉक्टर होण्याचे स्वप्न भंगले; कर्जत तालुक्यातील घटना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील जलालपूर येथील १९ वर्षीय अंकिता सुरेश सांगळे हिने नीट परीक्षेत अपेक्षित गुण न मिळाल्याने नैराश्यातून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अंकिता हिने २१ जून २०२६ रोजी झालेल्या नीट परीक्षेत १६६ गुण मिळवले होते. पात्रतेसाठी आवश्यक कट-ऑफ १७७ गुणांचा असल्याने ती पात्र ठरू शकली नव्हती. डॉक्टर होण्याचे तिचे स्वप्न अपूर्ण राहिल्याची खंत तिला सतावत होती. या मानसिक तणावातूनच तिने २५ जुलै रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास घरातील स्वतंत्र अभ्यासिकेत गळफास घेत आत्महत्या केली.

घटनेच्या वेळी तिचे वडील व भाऊ पंढरपूर येथे दर्शनासाठी गेले होते, तर आई घरातील कामात व्यस्त होती. बराच वेळ अंकिताची कोणतीही हालचाल न दिसल्याने आईने खोली उघडून पाहिले असता ती गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली. त्यानंतर शेजाऱ्यांना व पोलिसांना माहिती देण्यात आली.

पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

शवविच्छेदनानंतर रात्री उशिरा शोकाकुल वातावरणात अंकितावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणी अण्णा सांगळे यांच्या फिर्यादीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

आत्महत्येपूर्वी अंकिताने लिहिलेल्या चिठ्ठीत, नीट परीक्षेत अपेक्षित यश मिळाले नाही. डॉक्टर होण्याचे माझे स्वप्न पूर्ण झाले नाही. त्यामुळे मला नैराश्य आले आहे. माझ्या आत्महत्येसाठी माझे आई-वडील किंवा भाऊ यांना जबाबदार धरू नये, असा उल्लेख केला आहे.

# डॉ. ओहरा स्कूलमध्ये दिंडी उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने संगम ग्राम विकास मंडळ (संग्राम), संगमनेर संचलित डॉ. देवेंद्र ओहरा स्कूल फॉर स्पेशल चिल्ड्रन येथे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सहभागातून भक्तिमय दिंडीचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले.

या दिंडीत विद्यालयातील सर्व दिव्यांग विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी विठ्ठल - रुक्मिणी, वारकरी आदी पारंपरिक वेशभूषा परिधान करून दिंडीचे आकर्षण वाढविले. विद्यालयातून हरिनामाचा गजर करत दिंडीला प्रारंभ झाला. त्यानंतर मूकबधिर विद्यालयात पहिले रिंगण पार पडले. हरिनामाच्या अखंड जपाने



परिसर भक्तिमय झाला.

यानंतर दिंडी वाजत - गाजत इथापे मेडिकल कॉलेज येथे पोहोचली. यावेळी मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी,प्राध्यापक व कर्मचारी यांनी दिव्यांग विद्यार्थ्यां समवेत विठू माऊलीच्या नामघोषात सहभागी होत दिंडीचा आनंद उत्साहात साजरा केला.

या दिंडीचे विशेष आकर्षण म्हणजे घुलेवाडी येथील गंगा भानू वारकरी मुलींची शिक्षण संस्था. संस्थेच्या सौ. अनिताताई जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी विद्यालयातील विद्यार्थिनींनी टाळ, मृदुंग व वीणेच्या साथीने विठ्ठल नामाचा गजर करत संपूर्ण वातावरण भक्तिरसाने भारावून टाकले. त्यांच्या सहभागामुळे दिंडीचा उत्साह द्विगुणित झाला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व सहकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. या भक्तिमय दिंडीमुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरेचा आनंद अनुभवता आला.

# आषाढी एकादशीला प्राईड अकॅडमीची वृक्षदिंडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** माऊली प्रतिष्ठान संचलित प्राईड अकॅडमीने आषाढी एकादशीचे औचित्य साधत भक्ती, संस्कार आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी भव्य वृक्षदिंडी काढून टाकळीभान गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन काढले. पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा उपक्रम विशेष आकर्षणाचा ठरला.

माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक ज्ञानेश्वर माऊली मुरकुटे यांच्या प्रेरणेतून व प्राईड अकॅडमीच्या संस्थापिका डॉ. वंदना मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित दिंडी प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टाकळीभान येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापर्यंत पार पडली. गावातील विविध ठिकाणी कमानी उभारून, पुष्पवृष्टी करत आणि टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

वारकरी, विठ्ठल-रुक्मिणी, तुळशी तसेच पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी ''ज्ञानोबा-तुकाराम''च्या जयघोषात गावभर भक्तीमय वातावरण निर्माण केले. दिंडीतून वृक्षसंवर्धनाचा संदेश देत पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी संत गोरोबा काका यांच्या जीवनावर आधारित नाट्यप्रयोग, विठ्ठलाचे मनोहारी दर्शन आणि विठ्ठल भक्तीवरील आकर्षक नृत्य सादर केले. या सादरीकरणांना पालक, ग्रामस्थ आणि उपस्थित



मान्यवरांनी उत्स्फूर्त दाद दिली.

दिंडीचा समारोप श्री साईबाबा मंदिर परिसरात वृक्षारोपण करून करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले.

यावेळी सरपंच अर्चना रणनवरे, उपसरपंच कान्हा खंडागळे, शिवाजीराव शिंदे, राजेंद्र कोकणे, मयूर पटारे, यशवंतराव रणनवरे, राहुल पटारे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी नाश्त्याची व्यवस्था कान्हा खंडागळे व पृथ्वीराज उंद्रे यांनी केली.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राईड प्री-स्कूलच्या मुख्याध्यापिका वाडेकर, मिरीकर, प्रीती गोटे, प्राचार्या अस्मिता देवरे, उपप्राचार्य प्रदीप गोराणे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या आभार ज्ञानेश्वर मुरकुटे यांनी मानले.

> विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, वारकरी संप्रदाय, पर्यावरण संवर्धन आणि संस्कारमूल्यांचे महत्त्व पटवून देत अशा उपक्रमांमुळे सामाजिक जाणीव, सांस्कृतिक वारशाचा अभिमान, निसर्गप्रेम आणि राष्ट्रप्रेम अधिक दृढ होत आहे.
>
> **– डॉ. वंदना मुरकुटे**

# नियोजनबद्ध जलव्यवस्थापनाने टळेल पाणीटंचाई

## आ. अमोल खताळ; जवळेकडलग येथे आढळा नदीच्या पाण्याचे केले जलपूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** आढळा धरण पूर्ण क्षमतेने भरून ओव्हरफ्लो झाल्यानंतर नदीपात्रात मुबलक पाणी उपलब्ध झाले असून, या पाण्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन केल्यास शेती, पिण्याचे पाणी आणि भूजल पुनर्भरणाला मोठा फायदा होईल, असा विश्वास आ. अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

संगमनेर तालुक्यातील जवळेकडलग येथे आढळा नदीच्या पाण्याचे जलपूजन आ. अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.



यावेळी जलसंपदा विभागाचे अभियंता योगेश जोर्वेकर, प्रीतम शेवाळे यांच्यासह दत्ता कडलग, वैभव नाईकवाडी, सुरेश लांडगे, हरीश चकोर, संदेश देशमुख, सुशांत कडलग, बापूसाहेब देशमुख, भाऊसाहेब साळवे, राजेंद्र देशमुख, अशोक देशमुख, रोहिदास साबळे, संजय कडलग, कैलास आडभाई, मीनानाथ खताळ, रामा जमदाडे, विनोद सुर्वे, श्रीकांत कडलग, पोपट नाईकवाडी, शरद कदम, मनोज देशमुख, अरुण देशमुख, दिलीप देशमुख, रोहिदास गुंजाळ, आशिष कानवडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले की, पूर्वी धरणातील पाण्याचे नियोजन प्रभावीपणे होत नसल्याने शेती व पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्ध जलसंपत्तीचा अपेक्षित लाभ मिळत नव्हता. मात्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आढळा, भोजापूर आणि निळवंडे धरणांच्या पाण्याचे यंदा नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्यात आले. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा अधिक परिणामकारक वापर शक्य झाला आहे.

याच नियोजनामुळे गत उन्हाळ्यात निळवंडे, आढळा आणि भोजापूर धरणांमधून कालव्याद्वारे तब्बल आठ आवर्तने सोडण्यात आली. दुष्काळी परिस्थितीतही शेतकऱ्यांच्या पिकांना मोठा दिलासा मिळाला. भविष्यातही उपलब्ध जलसंपत्तीचा काटकसरीने व नियोजनबद्ध वापर करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आढळा धरणातून नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे नदीकाठच्या विहिरी, कूपनलिका आणि इतर जलस्रोतांची पाणीपातळी वाढण्यास मदत होणार असून, शेतीसाठी आवश्यक ओलावा टिकून राहणे, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुधारणे आणि भूजल पुनर्भरणाला चालना मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

> आढळा आणि भोजापूर धरणे पूर्ण क्षमतेने भरल्याने परिसराला मोठा दिलासा मिळाला आहे. या उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि काटकसरीने व्यवस्थापन केल्यास शेती, पिण्याचे पाणी आणि भूजल पातळी यासाठी वर्षभर मोठा लाभ मिळू शकतो.
>
> **– अमोल खताळ, आमदार**

# विद्यार्थ्यांनी साकारले संत-देवतांचे देखावे

## स्वामी समर्थ विद्यामंदिराच्या बालदिंडीतून वारकरी परंपरेचे जतन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** आषाढी एकादशीचे औचित्य साधून पाथर्डी शहरातील स्वामी समर्थ विद्यामंदिराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य बालदिंडीने संपूर्ण शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले. पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वारकरी परंपरेचे दर्शन घडविले.

हातात भगव्या पताका, मुखी विठ्ठल नामाचा अखंड गजर आणि पारंपरिक वारकरी वेशभूषेमुळे दिंडीला विशेष आकर्षण लाभले. विद्यार्थ्यांनी भगवान विठ्ठल-रुक्मिणी, विविध संत, देव-देवता तसेच महापुरुषांच्या वेशभूषा साकारून उपस्थितांची मने जिंकली. विशेषतः भगवान श्रीविष्णूंचे वाहन गरुडावर आरूढ झालेल्या संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांची वेशभूषा आणि प्रतीकात्मक



देखावा दिंडीचे मुख्य आकर्षण ठरला.

विद्यार्थिनींनी विठ्ठल भक्तिगीतांवर तालबद्ध नृत्य सादर करत वारकरी संप्रदायातील भक्तीभाव सजीव केला. भगवे झेंडे, लेझीम, टाळ-मृदुंगाचा नाद आणि हरिनामाच्या गजरामुळे पाथर्डीकरांना पंढरपूरच्या वारीचा अनुभव मिळाला.

ही बालदिंडी नाईक चौक, अजंठा चौक, क्रांती चौक, कोरडगाव चौक आणि शेवगाव रोड मार्गे वामनभाऊ नगर येथील स्वामी समर्थ मंदिरापर्यंत काढण्यात आली. मंदिरात आरती व हरिनामाच्या गजरात दिंडीचा भक्तिमय वातावरणात समारोप झाला. शाळेचे मुख्याध्यापक एकनाथ ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल साबळे, सुनिता गोसावी, सुधीर पगारे, बंडू गाडेकर, प्रसाद मरकड, सोनाली सोनवणे, अनिता कानडे, प्रवीणा गोल्हार, स्मिता चिंतामणी, सचिन गवळी, वैशाली घायाळ, सायली डांगे, सुरेखा केकान, कृष्णा हनुमुने, अनिकेत झेंडे, प्रती गायकवाड आणि सोनाली शिंदे यांनी बालदिंडी यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# कोपरगाव तालुक्यात खताचा अवैध साठा

## दोघांवर गुन्हा; कारवाईचे शेतकऱ्यांकडून स्वागत



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगांव** : कोपरगाव तालुक्यातील मंजूर ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या सहकारी संस्थेच्या दुकानात इफको कंपनीचा रासायनिक खातांचा बेहिशोबी साठा ठेवला असता तो खत नियंत्रक निरीक्षक असलेल्या गणेश भाऊसाहेब बिरदवडे यांनी तपासाला असता त्यात मोठी विसंगती आढळून आल्याने त्यांनी कोपरगाव तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दखल केल्याने कोपरगाव तालुक्यात खळबळ उडाली आहे. या कारवाईचे शेतकऱ्यांनी स्वागत केले आहे. रासायनिक खतांची अवैध साठेबाजी हा शेती क्षेत्रातील एक अत्यंत गंभीर आणि चिंतेचा विषय बनला आहे. यामुळे थेट शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

खत पाहिजे असल्यास शेतकऱ्यांना जबरदस्तीने इतर नको असलेली औषधे किंवा मायक्रोन्युट्रिएंट्स खरेदी करायला लावणे. ऐन हंगामात खते महाग मिळाल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढतो. वेळेवर खत न मिळाल्यास पिकांची वाढ खुंटते आणि उत्पादनात घट होते. खतांसाठी तासनतास रांगेत उभे राहावे लागल्याने शेतकऱ्यांचा वेळ आणि श्रम वाया जात आहे.

प्रत्येक विक्रेत्याला दुकानाबाहेर खतांचा साठा आणि किमतीचा फलक लावणे व त्याची ऑनलाइन नोंद ठेवणे ही बाब बंधनकारक असताना कोपरगाव तालुक्यातील मंजूर ग्रामपंचायत हद्दीत नुकताच मंजूर हद्दीतील मंजूर विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या दुकानदाराचा प्रताप उघड झाला आहे. त्यात त्याने प्रत्यक्षात आपल्या गोदामात जास्त साठा असताना तो ऑनलाईन रेकॉर्डला कमी दाखवून शेतकऱ्यांची लुबाडणूक सुरू ठेवली होती. याबाबत काही शेतकऱ्यांनी कोपरगाव तालुका कृषी विभागाकडे तक्रार केली असता कृषी विभागाचे खत नियंत्रक आणि निरीक्षक गणेश बिरडवडे यांनी या दुकानाची तपासणी केली असता त्यात मोठी तफावत आढळून आली आहे. यात मे. मंजूर विविध कार्यकारी सेवा संस्थेचा सचिव दोषी आढळून आला आहे.

### साठा पुस्तक आढळून आले नाही

खत निरीक्षक बेदवडे यांनी तेथील खरेदी विक्रीची बिले, पुस्तके, इ-पास तपासले असता त्यात साठा पुस्तक आढळून आले नाही. खरेदी बिलाचा अभाव आढळून आला आहे. परवान्यात एकच गोदाम दाखविण्यात आले होते. त्याठिकाणी ३५४ गोन्यातील १५.९३ मेट्रिक टन साठा आढळून आला आहे. मात्र इ-पास वर साठा शिल्लक दाखवला नाही. परिणामी शासनाची फसवणूक केली आहे. यामुळे अधिकाऱ्यांच्या ही बाब लक्षात आल्याने हा घोटाळा उघड झाला आहे. व त्यातील ९३ हजार ३४१ रुपयांचा ३५४ गोण्यांचा माल जप्त केला असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

# समर्थ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांची कंपन्यांमध्ये निवड

## विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : गुणवत्तापूर्ण शिक्षण, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतलेल्या समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटने यंदाच्या प्लेसमेंट हंगामात पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची मोहोर उमटवली आहे.शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाविद्यालयातील २०२ विद्यार्थ्यांची देशातील विविध नामांकित बहुराष्ट्रीय व अग्रगण्य कंपन्यांमध्ये निवड झाली असून, उर्वरित विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण, इंटर्नशिप आणि स्वयंरोजगाराची वाट निवडत करिअरच्या नव्या क्षितिजाकडे आत्मविश्वासाने पाऊल टाकले आहे.



यंदाच्या प्लेसमेंटमधील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील सर्व ४१ विद्यार्थ्यांची शंभर टक्के प्लेसमेंट. क्वालिटेक लॅब्स, लीन फॅब लेझर इंजिनिअरिंग, कल्याणी टेक्नो फोर्स, झेडएफ स्टिअरिंग इंडिया, टाटा मोटर्स, बजाज ऑटो, याझाकी इंडिया, टाटा टेक्नॉलॉजी, एल अँड टी डिफेन्स, पेंटा फोर्ज, श्री इंजिनिअरिंग यांसारख्या देशातील प्रतिष्ठित औद्योगिक कंपन्यांनी समर्थच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर उद्योगविश्वाने पुन्हा एकदा विश्वासाची शिक्कामोर्तब केली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

### समर्थ प्लेसमेंटची ठळक वैशिष्ट्ये

२०२ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड , मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाची १००% प्लेसमेंट , १० विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाची निवड , १२ विद्यार्थी उद्योगांमध्ये इंटर्नशिप करत आहेत , ३ विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगाराचा मार्ग स्वीकारला, उद्योगाभिमुख प्रशिक्षणामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर करिअरच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत .

# उपसरपंच बसले आमरण उपोषणाला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**घारगाव** : संगमनेर तालुक्यातील साकुर पठार भागातील मुळा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा करत वाहतूक केली जात आहे.या अवैध वाळू तस्करीस जांबुत गावचे उपसरपंच सुभाष डोंगरे हे विरोध करत असल्याने वाळू तस्करांनी त्यांचे शेतीमालाचे व पाईपलाईन फोडून मोठे नुकसान केले. त्यांचेसह कुटुंबास जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी डोंगरे यांनी घारगाव पोलीस ठाण्यात तक्रारी देखील दाखल केल्या. परंतु पोलीस व महसूल प्रशासनाकडून वाळू तस्करांवर जाणीवपूर्वक कारवाई होत नसल्याने त्यांचे जीवितास धोका निर्माण झाला.शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याने न्याय मिळवण्यासाठी विविध स्तरावर निवेदने दिली गेली.अखेर हाताची घडी तोंडावर बोट तर झोपेचे सोंग घेतलेल्या प्रशासनाला खडबडून जागे करून न्याय मिळविण्यासाठी त्यांनी लोकशाही मार्गाने आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. मुळा नदी पात्रातून वाळू तस्करीस डोंगरे हे अडथळा निर्माण करतात. या आकस बुद्धीने काही वाळू तस्करांनी दहशत माजवत त्यांचे शेतातील कपाशी पिकात ट्रॅक्टर घालून उभे पिक भुईसपाट केले.शेतातील पाईप लाईन फोडून मोठे नुकसान केले. मुळा नदी पात्रात वाळूचे ढंपर, ट्रॅक्टर, जेसीबी सारखी वाहने ने- आण करण्यासाठी रस्त्याची अडचण निर्माण होत असल्याने तेथील वनक्षेत्रातून जेसीबीच्या सहाय्याने रस्ता बनविला.याबाबत डोंगरे यांनी वनविभागाकडे तक्रार केल्याचा रोष मनात धरून त्यांना व त्यांचे कुटुंबास जीवे मारण्याची धमकी दिली. परंतु वनविभाग अधिकाऱ्यांकडून संबंधित वाळू तस्करांवर अद्याप पर्यंत कुठलीही कायदेशीर कारवाई झाली नाही.संबंधितांवर जो पर्यंत कायदेशीर कारवाई करत गुन्हेगारांची दहशत संपवली जात नाही. तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार डोंगर यांनी केला आहे.

# बाभळेश्वर येथे पेन्शनधारकांचा मेळावा

**जनता आवाज वृत्तसेवा**




**प्रवरानगर** : ईपीएस-९५ राष्ट्रीय संघर्ष समितीच्या वतीने पेन्शनधारकांच्या विविध प्रलंबित मागण्या, संघटनात्मक बळकटी आणि आगामी आंदोलनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण भूमिका निश्चित करण्यासाठी रविवार, दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता बाभळेश्वर येथील सांस्कृतिक भवन एमएसईबी सबस्टेशन, एस.टी. स्टँडजवळ येथे भव्य पेन्शनधारक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास ईपीएस-९५ राष्ट्रीय संघर्ष समितीचे पश्चिम भारताचे संघटक सुभाषराव पोखरकर, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष एस. के. समिंदर, महिला आघाडीच्या उपाध्यक्षा आशाताई शिंदे यांच्यासह जिल्ह्यातील व राज्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. केंद्र सरकारकडे प्रलंबित असलेल्या ईपीएस-९५ पेन्शनधारकांच्या विविध मागण्यांवर मार्गदर्शन, संघटनेच्या पुढील वाटचालीबाबत चर्चा तसेच पेन्शनधारकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक दिशा या मेळाव्यात निश्चित केली जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. मेळाव्यास अहिल्यानगर जिल्ह्यासह परिसरातील जास्तीत जास्त ईपीएस-९५ पेन्शनधारक सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संघटनेची ताकद दाखवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या आयोजनासाठी आण्णासाहेब म्हस्के पाटील, जी. के. चिंतामणी, विनायक जगताप, रायभान तुपे, ए. यू. मोरे, पी. आर. ताजने, विलास जाधव, संजय इनामके, एस. के. सावंत, वसंत वाघचौरे आणि प्रकाश गव्हाणे हे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. पेन्शनधारकांच्या हक्कासाठी लढा अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# सोमैया हायस्कूलमध्ये कोडिंगचे वारे

## विद्यार्थ्यांची तंत्रज्ञानाकडे गरुडझेप!

**जनता आवाज वृत्तसेवा**




**श्रीरामपूर** : हिंद सेवा मंडळ संचालित येथील क. जे. सोमैया हायस्कूलमध्ये आता आधुनिक तंत्रज्ञानाचे वारे वाहू लागले असून, विद्यार्थ्यांसाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि ब्लॉक कोडिंगचे धडे गिरवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. इ. एन. पॉवर आणि युथ अनस्टॉपेबल यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेत हा अभिनव उपक्रम राबविला जात असून, विद्यार्थ्यांचा याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि तांत्रिक कौशल्ये विकसित व्हावीत, या उद्देशाने इ.एन.पॉवर कंपनीने विद्यालयाला स्टेम किट उपलब्ध करून दिल्या आहेत. या किट्समध्ये विविध इलेक्ट्रॉनिक साहित्यांचा समावेश आहे. केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता, या साहित्याच्या मदतीने विद्यार्थी आता स्वतः चे नाविन्यपूर्ण प्रकल्प तयार करत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, तांत्रिक कौशल्य आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढीस लागण्यास मोठी मदत होत आहे. हा महत्त्वपूर्ण उपक्रम इ. एन. पॉवरचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील मुंगेकर आणि प्रकल्प व्यवस्थापक प्रशांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली राबवला जात आहे.

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कोडिंग आणि एआयचे प्रशिक्षण देण्याचे कार्य रितीका पाटील करत आहेत. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका उषा गाडेकर व पर्यवेक्षक कल्याण लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच अध्यापक आणि ए.आय. समन्वयक अभिजित सराफ यांच्या पुढाकाराने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडत आहे.

# दरडवाडीमध्ये शेतकऱ्याची आत्महत्या

## दोघांवर गुन्हा दाखल; खर्डा पोलीस स्टेशनमध्ये तणाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जमीन हडपण्याचा प्रयत्न आणि शेतातील विजेच्या पोलवरून सतत मिळणाऱ्या धमक्यांमुळे त्रस्त होऊन दरडवाडी (ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) येथील विकास साहेबराव रणसिंग (वय ४०) या तरुणाने राहत्या घरी लोखंडी अँगलला दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

आत्महत्येपूर्वी त्यांनी मोबाईलमध्ये रेकॉर्ड केलेल्या व्हिडिओच्या आधारे दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवार दि.२६ जुलै रोजी सकाळी ९:३० वाजेच्या सुमारास दरडवाडी येथील विकास रणसिंग यांनी राहत्या घरातील लोखंडी



अँगलला दोरीने गळफास घेतला.

ही बाब त्यांची बहीण सुवर्णा पोडमल व पत्नी विद्या रणसिंग यांच्या निदर्शनास आली. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने खर्डा येथील लाड हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले, परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय,जामखेड येथे आणण्यात आला. यावेळी पत्नी विद्या रणसिंग यांनी मयत विकास यांचा मोबाईल तपासला असता, गॅलरीमध्ये विकास यांनी आत्महत्येपूर्वी रेकॉर्ड केलेले काही व्हिडिओ आढळून आले.

घटनेचे गांभीर्य ओळखून कर्जतचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांनी तातडीने खर्डा पोलीस ठाण्याला भेट दिली आणि परिस्थितीची माहिती घेतली. त्यांनी नातेवाईकांची समजूत काढून मृत विकास यांची पत्नी विद्या विकास रणसिंग (वय ३६) यांची फिर्याद नोंदवून घेतली. गुन्हा दाखल झाल्यानंतर जमाव शांत झाला आणि वातावरण पूर्वपदावर आले.

# पारनेरमध्ये शेतातील इलेक्ट्रिक वायरची चोरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : निघोजच्या पठारवाडी फाटा परिसरात शेतातील इलेक्ट्रिक पंपांच्या वायर चोरी झाल्याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पठारवाडी येथील फिर्यादी नामदेव हरिभाऊ पठारे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. २३ रोजी त्यांच्या व इतर शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत मोटारीसाठी वापरण्यात येणारी इलेक्ट्रिक वायर अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या घटनेमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शेतातील वीजपुरवठाही




विस्कळीत झाला आहे. त्यामुळे घरगुती वापरण्या कामी व जनावरांसाठी पाण्या करिता वीज पुरवठा खंडीत झाल्याने नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांनी पारनेर पोलीस ठाणे गाठत तक्रार दाखल केली.

या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास पारनेर पोलीस करत असून परिसरातील नागरिकांनी संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सध्या ग्रामीण भागात शेतातील वीज साहित्य चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ होत असून गत वर्षी पठारवाडी च्या शेतकऱ्यांच्या वीजेचे पंप, वायर चोरीस गेल्या होत्या. त्याचा तपास ही पोलीसांना करता आला नाही, तोच याही वर्षी पुन्हा शेतकऱ्यांच्याच चोरीची घटना घडली.

मध्यंतरी देवीभोयरे फाटा येथील शिवडोह तलावावरील वीजेचे पंप व वायरी चोरी चा गुन्हा दाखल झाला असून त्याची शाई वाळते न वाळते तोच पठारवाडी च्या शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

# नगरपंचायतच्या ‘त्या’ प्रशासकीय मान्यतांना स्थगिती

## मुख्याधिकाऱ्यांच्या चौकशीसह निलंबनाची याचिकेत मागणी!




**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा नगरपंचायतीच्या काही विकासकामांना देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतांना मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने पुढील आदेशापर्यंत अंतरिम स्थगिती दिली आहे. सर्वसाधारण सभेत मंजूर नसलेल्या ठरावांच्या आधारे या मान्यता देण्यात आल्याचा याचिकाकर्त्यांचा दावा असून, न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी व न्यायमूर्ती अभय डी. शिंदे यांच्या खंडपीठाने प्रकरणाची पुढील सुनावणी ४ ऑगस्ट २०२६ रोजी निश्चित केली आहे.

क्रांतिकारी शेतकरी पक्षाच्या नगरसेवकांनी दाखल केलेल्या रिट याचिकेत, ३१ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या अजेंड्यावर नसलेले व सभेत प्रत्यक्षात मंजूर न झाल्याचा दावा असलेल्या ठराव क्रमांक २०, २२, २३ व २४ यांच्या आधारे ३१ मार्च २०२६ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याचिकाकर्त्यांतर्फे अॅड. एस. एस. गंगाखेडकर यांनी बाजू मांडली. माहिती अधिकारातून प्राप्त कागदपत्रे व सभेचे इतिवृत्त न्यायालयात सादर करण्यात आल्यानंतर, न्यायालयाने प्रकरणाची प्रथमदर्शनी दखल घेतली. याचिकेत नेवासा नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांच्या भूमिकेवर गंभीर आक्षेप घेण्यात आला आहे.

कथित वादग्रस्त ठरावांच्या आधारे मंजुरी मिळविण्यात त्यांची भूमिका असल्याचा आरोप करत, अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांपेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या अधिकाऱ्यामार्फत स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, चौकशीवर परिणाम होऊ नये म्हणून चौकशी पूर्ण होईपर्यंत मुख्याधिकाऱ्यांची बदली अथवा निलंबन करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

या प्रकरणात राज्य शासन, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, नेवासा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी तसेच इतर संबंधितांना प्रतिवादी करण्यात आले असून, सर्वांना नोटीस बजावण्यात आली आहे. ३१ मार्च २०२६ रोजीच्या प्रशासकीय मान्यतांच्या आधारे कोणताही निधी खर्च करू नये, या मागणीची दखल घेत न्यायालयाने संबंधित मान्यतांना पुढील आदेशापर्यंत अंतरिम स्थगिती दिली आहे. त्यामुळे संबंधित विकासकामे, निधी खर्च व प्रशासकीय निर्णयप्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता असून, आता ४ ऑगस्ट २०२६ रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# तामसवाडीत भरदिवसा झाली घरफोडी

## एक लाख साठ हजाराचा ऐवज लांबवला!

**जनता आवाज वृत्तसेवा**



**नेवासा** : नेवासा तालुक्यातील तामसवाडी येथे अज्ञात चोरट्यांनी भरदिवसा बंद घराचे कुलूप तोडून १ लाख ६० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना रविवारी (दि. २६) घडली. फवारणीसाठी शेतात गेलेल्या शेतकरी कुटुंबाच्या अनुपस्थितीचा फायदा घेत चोरट्यांनी सोन्याचे दागिने आणि रोकड लांबवली. या प्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तामसवाडी येथील प्रमोद रामकृष्ण उंदरे (वय ३९) हे रविवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास पत्नी, मुलगा आणि आईसह नातेवाईक सुनील कडुळे यांच्या खरवंडी रोडलगतच्या शेतात फवारणीच्या कामासाठी गेले होते. घराला कुलूप लावून संपूर्ण कुटुंब बाहेर पडल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला.

दुपारी दीडच्या सुमारास उंदरे कुटुंब घरी परतले असता, मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत दिसले. घरातील कपाट उघडे असून सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. चोरट्यांनी कपाटातील एक तोळ्याचे सोन्याचे गंठण, पाच ग्रॅमचे सोन्याचे झुमके, पाच ग्रॅमचे बदामी आकाराचे सोन्याचे फुल आणि ३० हजार रुपयांची रोकड, असा एकूण १ लाख ६० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता.

भरदिवसा घडलेल्या या धाडसी घरफोडीमुळे तामसवाडी परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. प्रमोद उंदरे यांच्या फिर्यादीवरून नेवासा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, चोरट्यांचा माग काढण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे.

# संपादकीय

## जनशक्तीचा विजय

विद्यार्थ्यांच्या आंदोलनापुढे नमून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिलेला राजीनामा हा केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्याचा प्रसंग नाही. हा लाखो विद्यार्थ्यांच्या संघर्षाचा सन्मान आहे. हा लोकशाहीच्या जिवंतपणाचा पुरावा आहे. हा नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांचा विजय आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सत्ता कितीही बलाढ्य असली, तरी जनतेच्या सामूहिक इच्छाशक्तीपेक्षा मोठी नसते, हा संदेश त्यातून मिळाला आहे. देशभरात तरुणांनी उभारलेले आंदोलन हे कोणत्याही एका पक्षाच्या झेंड्याखाली उभे राहिलेले नव्हते. त्यामागे होती ती भविष्याची चिंता, मेहनतीचा अपमान आणि व्यवस्थेवरील वाढता अविश्वास. या आंदोलनाने सरकारला सतत प्रश्न विचारले. परीक्षा सुरक्षित का नाहीत? दोषींवर कठोर कारवाई का होत नाही? विद्यार्थ्यांना वारंवार मानसिक त्रास का सहन करावा लागतो? लाखो तरुणांच्या आयुष्याशी खेळणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदा का नाही? या प्रश्नांना केवळ निवेदने, पत्रकार परिषद किंवा आश्वासने पुरेशी ठरत नव्हती. सरकारवर वाढत गेलेला दबाव हा अखेर राजकीय निर्णयात परिवर्तित झाला. सरकारला हा निर्णय घ्यावा लागला, याचा अर्थ केवळ राजकीय समीकरणे बदलली असे नाही, तर जनमताचे स्वरूप इतके प्रभावी झाले की त्याकडे दुर्लक्ष करणे शक्य राहिले नाही. लोकशाहीत सरकार बहुमताने सत्तेत येते; पण त्या बहुमताचा अर्थ जनतेच्या भावना कायम दुर्लक्षित करण्याचा परवाना नसतो. लोकशाहीची खरी ताकद निवडणुकीपुरती मर्यादित नसते. ती रस्त्यावर उतरलेल्या नागरिकांत, प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांत, न्याय मागणाऱ्या पालकांत, सत्य समोर आणणाऱ्या माध्यमांत आणि घटनात्मक संस्थांवर विश्वास ठेवणाऱ्या समाजात असते. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने हेच दाखवून दिले. शांततामय, सातत्यपूर्ण आणि व्यापक लोकदबाव निर्माण झाला तर कोणतेही सरकार निर्णय बदलण्यास किंवा जबाबदारी स्वीकारण्यास भाग पडू शकते. परीक्षांमधील गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर कायदा करण्याची वेळ सरकारवर आली, हेही या आंदोलनाचेच यश आहे. अनेक वर्षे पेपरफुटीच्या घटना घडत होत्या. विविध राज्यांमध्ये भरती प्रक्रिया रद्द होत होती. न्यायालयात खटले सुरू होते. विद्यार्थ्यांचे वय वाढत होते, संधी कमी होत होत्या, तरीही व्यापक राष्ट्रीय पातळीवर ठोस कायदेशीर चौकट तयार करण्याकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले गेले नाही; परंतु जेव्हा लाखो तरुणांनी प्रश्न उपस्थित केले, तेव्हा सरकारला केवळ प्रशासनिक कारवाई पुरेशी नसल्याचे लक्षात आले. कठोर शिक्षेची तरतूद, संघटित गुन्हेगारीवर नियंत्रण आणि परीक्षा प्रक्रियेचे संरक्षण यासाठी कायदा आवश्यक असल्याचे मान्य करावे लागले. हा बदल स्वतःहून झालेला नसून लोकदबावातून घडलेला आहे. प्रधान यांचा राजीनामा हा नैतिक जबाबदारीचा स्वीकार मानला जावा, की राजकीय अपरिहार्यता, यावर मतभेद असू शकतात; परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे, की हा निर्णय सरकारने कोणत्याही कारणाशिवाय घेतलेला नाही. जर विद्यार्थ्यांचे आंदोलन इतके व्यापक झाले नसते, जर देशभरात परीक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले नसते, जर जनमत सरकारविरोधात ठाम उभे राहिले नसते, तर कदाचित हा निर्णयही झाला नसता. त्यामुळे या राजीनाम्यामागे खरा विजय हा आंदोलनाचा आहे.

दुर्दैवाने अलीकडच्या काळात प्रश्न विचारणाऱ्यांकडे संशयाने पाहण्याची प्रवृत्ती वाढली होती. आंदोलन करणाऱ्यांना राजकीय शिक्के मारले गेले, त्यांच्या हेतूंवर प्रश्न उपस्थित झाले; मात्र विद्यार्थ्यांनी दाखवून दिले, की भविष्याशी संबंधित प्रश्नांवर ते कोणत्याही पक्षाच्या चौकटीत अडकून राहणार नाहीत. त्यांना रोजगार हवा आहे, पारदर्शक परीक्षा हव्यात आणि गुणवत्तेला न्याय हवा आहे. ही मागणी लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांशी सुसंगत आहे. या घटनेतून विरोधी पक्षांनाही एक धडा मिळतो. केवळ संसदेत सरकारवर टीका करून चालत नाही. जनतेच्या प्रश्नांशी सातत्याने जोडलेले राहणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळाला, विविध स्तरांवर चर्चा झाली आणि त्यामुळे सरकारवर दबाव वाढला. लोकशाहीत सशक्त विरोधकांची भूमिका किती महत्त्वाची असते, याचीही या आंदोलनाने आठवण करून दिली. सरकारसाठीही हा आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. परीक्षा प्रणाली ही केवळ शिक्षण मंत्रालयाचा विषय नाही. ती देशाच्या भविष्यातील प्रशासकीय, तांत्रिक आणि आर्थिक विकासाशी जोडलेली आहे. जर गुणवंत तरुणांचा व्यवस्थेवरील विश्वासच उडाला, तर त्याचे दूरगामी परिणाम देशाच्या प्रगतीवर होतील. त्यामुळे केवळ कायदा करून प्रश्न सुटणार नाही. परीक्षा घेणाऱ्या संस्थांची स्वायत्तता, तांत्रिक सुरक्षितता, उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि दोषींना तातडीने शिक्षा या सर्व बाबींमध्ये मूलभूत सुधारणा कराव्या लागतील. आजचा भारतीय युवक पूर्वीपेक्षा अधिक जागरूक आहे. तो 'सोशल मीडिया'च्या माध्यमातून माहिती मिळवतो, तथ्य पडताळतो आणि संघटित होतो. त्यामुळे कोणत्याही प्रश्नावर जनमत वेगाने तयार होते. सरकारने या नव्या वास्तवाची दखल घेणे आवश्यक आहे. संवाद टाळून, टीका नाकारून किंवा आंदोलनांना दुर्लक्ष करून प्रश्न सुटत नाहीत. उलट असंतोष वाढतो. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने हे स्पष्ट केले, की संवादाचा पर्याय कोणत्याही लोकशाहीत नसतो. निवडणुकीत दिलेले बहुमत हे जनतेच्या विश्वासाचे प्रतीक असते; परंतु तो विश्वास टिकवण्यासाठी उत्तरदायित्वही स्वीकारावे लागते. सरकार कितीही शक्तिशाली असले, तरी लोकांच्या सातत्यपूर्ण आणि न्याय्य आवाजापुढे त्याला अखेर नमावेच लागते. ही घटना कोणत्याही सरकारसाठी इशारा आहे, की तरुणांच्या आकांक्षा दुर्लक्षित करता येत नाहीत. रोजगार, शिक्षण, गुणवत्ता आणि न्याय या प्रश्नांवर संवेदनशीलता दाखवावीच लागेल. अन्यथा, असंतोष अधिक व्यापक स्वरूप धारण करू शकतो. लोकशाहीचा खरा अर्थ निवडणूक जिंकण्यात नसून लोकांचा विश्वास जिंकण्यात आहे. आज या संपूर्ण घडामोडीकडे पाहताना असे म्हणावेसे वाटते, की हा आंदोलनाने सरकारला निर्णय बदलण्यास भाग पाडले. परीक्षांतील गैरव्यवहाराविरोधात कठोर कायद्याची गरज मान्य करायला लावली आणि उत्तरदायित्वाची जाणीव करून दिली. यापुढे सरकार या मुद्द्यांकडे कसे लक्ष देते ते आता पहायचे.

# पर्यावरणाचीच नव्हे, उपजीविकेचीही लढाई

पर्यावरण

– मिलद बेंडाळे, पर्यावरण अभ्यासक

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अलीकडील अहवालाने जगाचे लक्ष केवळ तापमानवाढीच्या मुद्द्याकडे वेधले नाही, तर हा इशारा मानवी सभ्यतेच्या सर्वात मूलभूत आधारस्तंभांपैकी एक असलेल्या शेती आणि अन्नसुरक्षेवर घोंगावत असलेल्या संकटाबाबतही आहे. उष्णतेच्या लाटा हा आता केवळ ऋतुमानाचा भाग राहिलेला नाही. ते हळूहळू समाज, अर्थव्यवस्था, रोजगार आणि मानवी आरोग्यासमोरील गंभीर आव्हान बनत आहे.



पृथ्वी सूर्याच्या वाढत्या तापाने होरपळून निघू लागते, तेव्हा केवळ ऋतू बदलत नाहीत, तर जीवनाचा संपूर्ण समतोल डळमळू लागतो. एके काळी वैशाख-ज्येष्ठातील कडक ऊन हे भारतीय उपखंडाच्या नैसर्गिक हवामानाचे वैशिष्ट्य मानले जात होते; परंतु आज त्याच उष्णतेने अभूतपूर्व संकटाचे स्वरूप धारण केले आहे. तापमानातील सातत्यपूर्ण वाढ, उष्णतेच्या लाटांची वाढती तीव्रता आणि बदलत्या हवामानाचा अनिश्चित स्वभाव यामुळे केवळ निसर्गच नव्हे, तर मानवी जीवनाचे सर्वच पैलू प्रभावित होत आहेत. शेतजमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. नद्या आणि जलाशय आक्रसत आहेत, झाडांची हिरवाई पिवळसर होत चालली आहे आणि शेतकऱ्यांच्या चेहऱ्यांवर भविष्याबद्दलची चिंता गडद होताना दिसत आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशासाठी हे संकट अधिकच चिंताजनक आहे. देशातील कोट्यवधी नागरिकांचे जीवन आणि उपजीविका थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहेत. शेती ही केवळ अन्नधान्यनिर्मितीची प्रक्रिया नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया आहे. ती कुटुंबांच्या आशा-आकांक्षांना पोसते. गावांच्या सामाजिक रचनेला स्थैर्य देते आणि देशाच्या आर्थिक विकासालाही हातभार लावते. हवामानबदलामुळे शेतीवर होणारे परिणाम संपूर्ण समाजव्यवस्थेवर पडसाद उमटवतात. तापमान नेहमीपेक्षा वाढून सलग अनेक दिवस उष्णतेच्या लाटा सुरू राहतात, तेव्हा त्याचा सर्वप्रथम परिणाम जमिनीवर आणि पिकांवर होतो. जमिनीतील ओलावा कमी होऊ लागतो. पिकांच्या वाढीचा वेग मंदावतो आणि उत्पादनक्षमतेत घट येते. विशेषतः वाढत्या तापमानाबाबत अत्यंत संवेदनशील असलेली भातासारखी पिके भात उत्पादनासमोर गंभीर आव्हाने उभी करतात.

भारतामध्ये हवामानबदलाचे परिणाम आता स्पष्टपणे जाणवू लागले आहेत. काही दशकांपूर्वी मार्च आणि एप्रिल महिन्यांपर्यंत हवामान तुलनेने आल्हाददायक असे; आता मात्र फेब्रुवारीच्या अखेरीपासूनच उष्णतेचा प्रभाव वाढू लागतो. अनेक राज्यांमध्ये तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे जात आहे. पंजाब, हरियाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता सातत्याने वाढताना दिसत आहे. याचा सर्वाधिक परिणाम शेतीवर होत आहे. गव्हासारखी पिके अपेक्षेपेक्षा लवकर परिपक्व होतात. दाण्यांचा आकार कमी राहतो आणि एकूण उत्पादन घटते. भाताच्या शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवश्यकता असते; परंतु वाढते तापमान आणि अनियमित पर्जन्यमानामुळे जलसंकट तीव्र होत आहे. सिंचनासाठी आवश्यक पाणी उपलब्ध न झाल्यास काही दिवसांमध्येच शेतकऱ्यांची महिनोनमहिने केलेली मेहनत वाया जाऊ शकते. एके काळी शेतकरी हवामानाच्या संकेतांवर आधारित शेती नियोजन करत असत. ऋतूंच्या चक्राचा अनुभव आणि परंपरागत ज्ञान यांच्या आधारे शेती व्यवस्थापित केली जात असे; परंतु आज हवामानातील अनिश्चिततेने या अनुभवांनाही आव्हान दिले आहे. परिणामी, शेती हा दिवसेंदिवस अधिक जोखमीचा व्यवसाय बनत चालला आहे. अत्याधिक उष्णतेचा परिणाम केवळ शेती उत्पादनांवरच मर्यादित रहात नाही. त्याचा थेट परिणाम श्रमबाजारावर आणि रोजगारावरही होतो.

जगभरात कामाचे कोट्यवधी तास वाढत्या उष्णतेमुळे नष्ट होत असल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. भारतामध्ये ही समस्या अधिक गंभीर आहे. कारण येथे मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या खुल्या वातावरणात काम करते. शेतकरी, शेतमजूर, बांधकाम क्षेत्रातील कामगार आणि विविध असंघटित क्षेत्रांमधील श्रमिक यांना वाढत्या तापमानाचा सर्वाधिक फटका बसतो. उष्णता असह्य बनते, तेव्हा कामाचे तास कमी करावे लागतात. परिणामी, उत्पादनक्षमता घटते आणि मजुरांच्या उत्पन्नावर परिणाम होतो. याचा सर्वाधिक फटका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना बसतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेती हे केवळ उत्पन्नाचे साधन नाही, तर सामाजिक स्थैर्याची हमीदेखील आहे. शेती सतत तोट्यात जाऊ लागली, तर ग्रामीण भागात बेरोजगारी वाढेल आणि शहरांकडे स्थलांतराचे प्रमाणही वाढेल. गेल्या काही दशकांमध्ये भारतातील शहरांवर लोकसंख्येचा प्रचंड ताण निर्माण झाला आहे. पायाभूत सुविधांवरील दबाव, प्रदूषण, वाहतूक कोंडी आणि संसाधनांची कमतरता ही आधीच गंभीर समस्या बनली आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाल्यास शहरी व्यवस्थेवरील ताण आणखी वाढेल. त्यामुळे हवामानबदलाचा प्रश्न केवळ शेतीपुरता मर्यादित नसून व्यापक सामाजिक आणि आर्थिक परिणाम घडवून आणणारा आहे. ग्रामीण भारतात पशुपालन हे शेतीइतकेच महत्त्वाचे उपजीविकेचे साधन मानले जाते; परंतु वाढत्या उष्णतेमुळे या क्षेत्रालाही गंभीर फटका बसत आहे. जनावरांची दूध उत्पादन क्षमता कमी होत आहे. चारा आणि पाण्याची कमतरता निर्माण होऊन पशुधनाच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

कुक्कुटपालन उद्योगालाही समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तापमान वाढल्याने पक्ष्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढते आणि उत्पादकतेत घट येते. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. फळे आणि भाजीपाला उत्पादनही या संकटापासून अलिप्त राहिलेले नाही. वाढत्या तापमानामुळे फळे वेळेआधी पिकतात आणि त्यांची गुणवत्ता घसरते. भाजीपाल्याचे उत्पादन कमी झाल्यामुळे बाजारातील किमती वाढतात. त्याचा थेट परिणाम महागाईवर होतो आणि सामान्य नागरिकांच्या घरगुती अर्थकारणावर अतिरिक्त भार पडतो. भारतातील भात उत्पादनावर घोंगावणारा धोका विशेषतः चिंताजनक आहे. कारण भात हे केवळ एक कृषी उत्पादन नाही, तर देशातील कोट्यवधी लोकांच्या अन्नसुरक्षेचा पाया आहे. पूर्व भारत हा भात उत्पादनाचा प्रमुख प्रदेश मानला जातो. या भागात तापमान सातत्याने वाढत राहिले आणि पाण्याची उपलब्धता कमी होत गेली, तर उत्पादनात मोठी घट होऊ शकते. अशा परिस्थितीत अन्नधान्याच्या किमती वाढतील, गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवरील आर्थिक ताण वाढेल आणि सामाजिक विषमता गडद होईल. ग्रामीण भागातील लहान शेतकरी, शेतमजूर आणि लघुउत्पादक पर्यावरणाला सर्वात कमी हानी पोहोचवतात, तरीही हवामान बदलाचे दुष्परिणाम त्यांनाच सर्वाधिक सोसावे लागतात. दुसरीकडे, औद्योगिकीकरणाच्या नावाखाली विकसित देशांनी दशकभर प्रचंड प्रमाणात कार्बन उत्सर्जन केले. आज पृथ्वी तापत असताना विकसनशील देशांना आणि गरीब समाजघटकांना परिणाम भोगावे लागत आहेत. त्यामुळे जागतिक पातळीवर हा प्रश्न अधिक महत्त्वाचा बनत आहे.

आज भारताने आपल्या कृषी धोरणांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना हवामानाची अचूक माहिती, प्रभावी पीकविमा संरक्षण आणि आधुनिक तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. सौरऊर्जेवर आधारित सिंचन व्यवस्था, जलसंधारण, नैसर्गिक शेती आणि हवामानाशी सुसंगत कृषी पद्धती यांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे; मात्र ही जबाबदारी केवळ सरकारची नाही. समाजालाही आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करावा लागेल. संसाधनांचा अतिरेकाने वापर, उधळपट्टी आणि निसर्गाविषयीची असंवेदनशीलता यामुळेच आजची परिस्थिती निर्माण झाली आहे. पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे, ऊर्जाबचत करणे, हरित क्षेत्रांचे संवर्धन करणे आणि प्रदूषण कमी करणे या बाबतीत प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची आहे. आपण हे विसरून चालणार नाही, की पृथ्वी ही केवळ संसाधनांचा साठा नाही, तर जीवनाचा आधार आहे. शेतांमधील हिरवाई ही केवळ शेतकऱ्यांची नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या अस्तित्वाची हमी आहे. आपल्या ताटातील प्रत्येक घास हा शेतातूनच येतो. त्यामुळे शेतीचे भविष्य सुरक्षित राहणे म्हणजे देशाचे भविष्य सुरक्षित राहणे होय. आजची वेळ केवळ चिंता करण्याची नाही, तर ठोस कृती करण्याची आहे. जगाने हवामानबदलाच्या संकटाकडे गांभीर्याने न पाहिल्यास भविष्यात कोरडी पडलेली जमीन, रिकामे जलाशय आणि अन्नटंचाई हे कठोर वास्तव ठरू शकते. त्यामुळे हा केवळ पर्यावरणाचा नाही, तर मानवी अस्तित्वाचा प्रश्न आहे. पृथ्वीचे संरक्षण करणे ही आता कोणतीही आदर्शवादी कल्पना नसून मानवजातीच्या भविष्याच्या संरक्षणासाठी अपरिहार्य अट बनली आहे.

पान १ वरून

## 'युवकांच्या भविष्याशी खेळ'

असा मोठा आणि खळबळजनक दावा रोहित पवारांनी केला आहे. यावेळी आ. पवारांनी औषध निरीक्षक भरतीचा मूळ पेपर आणि विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दोन दिवस आधी पाठवण्यात आलेला पेपर स्क्रीनवर दाखवला. या सगळ्याबाबत आम्ही एमपीएससी कार्यालयात आम्ही जाणार आहोत. तसेच तुकाराम मुंढे यांनादेखील भेटणार आहोत, असे रोहित पवार यांनी सांगितले.

गेल्या काही वर्षांमध्ये महाराष्ट्रात टीईटी, नीट, एसआरपीएफ, एचएससी केमेस्ट्री, जलसंधारण, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोतवाल भरती, तलाठी भरती, महाजनको अशा विविध परीक्षांचे पेपर लीक झाले. या परीक्षांसाठी गरिबांची मुलं खूप परिश्रम घेतात. पण महाराष्ट्रात पैसे देऊन आणि आपल्या विचाराची लोक यंत्रणेत असावी या हेतूने पेपर लीक केले जात असल्याचा आरोप आ. पवार यांनी केला.

एफडीएच्या अंतर्गत येणाऱ्या औषध निरीक्षक भरतीचा पेपर फुटला होता, त्याबद्दल मी सांगतो. एफडीए खात्यात तुकाराम मुंढे यांच्यासारखा प्रामाणिक अधिकारी असेल तर चांगले काम होते. पण ते वरच्या लेव्हलला आहेत. त्यांच्या खाली असणारे अधिकारीही चांगले असले पाहिजेत. पण पैसे देऊन एखादी व्यक्ती औषध निरीक्षक अधिकारी झाली असेल तर तो नोकरीत आल्यावर आधी पैसे वसूल करण्याचे बघेल. ते काम योग्य पद्धतीने होणार नाही. या पदावर एखादी व्यक्ती पैसे देऊन गेली असेल तर काय अनर्थ होऊ शकतो, याचे उदाहरण आपण बघितले आहे. कफ सिरपमुळे गरिबांची २२ मुलं मेली. दुर्दैवाने महाराष्ट्रात हाच पेपर फुटला होता आहे. या पदावर गेलेली काही लोकं पैसे देऊन अधिकारी झाली आहेत, असे आ. पवार यांनी सांगितले. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांमध्ये या प्रकारामुळे प्रचंड संतापाचे वातावरण आहे. आता एमपीएससी खरोखरच या प्रकरणाची पारदर्शक चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करते की हे प्रकरणही इतर घोटाळ्यांसारखे थंड बस्त्यात जाते, याकडे राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे लक्ष लागले आहे.

## शेतकऱ्यांचे नुकसान करणारा निर्णय अमान्य

प्रस्तावित राहुरी-शनिशिंगणापूर रेल्वेमार्गामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर एकत्रित भूमिका निश्चित करण्यासाठी दि. २७ जुलै रोजी उंबरे येथील साई मंगल कार्यालयात सर्व बाधित शेतकऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते.

माजी मंत्री तथा विधानपरिषद सदस्य आ. प्राजक्त तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत रेल्वेमार्गाविरोधात व्यापक कृती समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच प्रत्येक गावातून पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन प्रतिनिधी निवडून कृती समिती स्थापन करण्याची सूचना आ. तनपुरे यांनी बैठकीत केली. या विषयावर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव तसेच केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे तनपुरे यांनी सांगितले. मुख्यमंत्री यांच्या माध्यमातून केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन बाधित शेतकऱ्यांची भूमिका मांडण्यासाठी शिष्टमंडळ नेण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. आवश्यकतेनुसार मुंबई तसेच दिल्ली येथेही तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

प्रत्येक गावातून पक्षीय भेद बाजूला ठेवून सक्षम प्रतिनिधी निवडून कृती समिती स्थापन करण्याचे आवाहन करताना तनपुरे यांनी या समितीत शेतकरी, वकील, पत्रकार, सोशल मीडियाचे जाणकार तसेच विविध क्षेत्रांतील प्रतिनिधींचा समावेश करण्याची सूचना केली. आंदोलन अधिक प्रभावी करण्यासाठी गावागावांत जनजागृती मोहीम राबविणे, माध्यमांच्या माध्यमातून विषय मांडणे आणि सोशल मीडियावर व्यापक जनआंदोलन उभे करण्याचे आवाहनही त्यांनी केले. जमिनी संपादनासाठी कोणताही करार करू नका. प्रकल्पाला कोणत्याही प्रकारचे सहकार्य करू नका. शेतकऱ्यांच्या हक्कांचा हा लढा शेवटपर्यंत लढला जाईल. गरज पडल्यास जेलभरो आंदोलन करण्यासही आम्ही तयार आहोत, असे ठाम प्रतिपादन आ. तनपुरे यांनी केले. बैठकीत उपस्थित शेतकरी आणि विविध गावांतील प्रतिनिधींनीही प्रस्तावित रेल्वेमार्ग रद्द करण्यासाठी मुख्यमंत्री, पालकमंत्री, खासदार तसेच सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, अशी मागणी केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी व्यापक लोकआंदोलन उभारण्याचा निर्धारही बैठकीत व्यक्त करण्यात आला. बैठकीच्या शेवटी प्रस्तावित रेल्वेमार्गाविरोधात कृती समिती स्थापन करण्याचा अधिकृत निर्णय घेण्यात आला. प्रत्येक गावातून प्रतिनिधींची नावे तातडीने सादर करण्याचे आवाहन करण्यात आले असून, पुढील आंदोलनाची दिशा कृती समितीच्या माध्यमातून निश्चित केली जाणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

यावेळी बैठकीला बैठकीस तनपुरे कारखान्याचे माजी चेअरमन नामदेव ढोकणे, सुनील अडसूरे, विजय बानकर, राजेंद्र ढोकणे, भागवत देशमुख, डॉ. राजेंद्र बानकर, संचालक डॉ. माऊली दरंदले, धनंजय, वसंत कुसळकर, व्ही. एम. दरंदले, एस. बी. शेटे, शेतकरी संघटनेचे नेते अनिल निमसे, रामेश्वर कुसळकर यांच्यासह विविध गावांतील शेतकरी, ग्रामस्थ व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रवरा मातेचे खण-नारळाने पूजन

मंदिरापासून सुरू होते. या नदीवर भंडारदरा आणि निळवंडे धरण आहे. प्रवरा नदीचे महत्व संगमनेरकर आणि उत्तर नगर जिल्ह्यातील नागरिकांच्या जीवनात मोठे आहे. या नदीमुळे शेती फुलली आहे. जीवनमान फुलले आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी या नदीवर निळवंडे धरण निर्माण केले असून या धरणामुळे दुष्काळी भागात पाणी आले आहे. ही नदी जीवनदायी असून या पुढील काळातही कायम वाहत राहो. सर्वांच्या जीवनात समृद्धी निर्माण होवो, अशी प्रार्थना त्यांनी केली. डॉ. मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, निळवंडे धरणामुळे संगमनेर शहरातील नागरिकांना थेट पाईपलाईनद्वारे दररोज स्वच्छ व मुबलक पाणी मिळत आहे. यावर्षी धरणे लवकर भरल्याने नागरिकांना चांगले पाणी मिळणार आहे. नदीला भारतीय संस्कृतीमध्ये आईची महत्त्व दिले आहे. आणि या अमृतवाहिनीने आपल्या सगळ्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला आहे. प्रवरा नदीला दुथडी पूर आला असून नागरिकांनी या काळामध्ये सतर्क रहावे, याचबरोबर तरुणांनी सेल्फीसाठी स्टंटबाजी न करता अधिक काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी नदीचे पूजन करून तिच्या प्रतिक कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमासाठी संगमनेर शहरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पान १ वरून

पान १ वरून

## रुग्णवाहिका नाकारल्यानेच मृत्यू

व्यक्तींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. यावेळी बाबासाहेब भोस, बाळासाहेब नाहाटा, टिळक भोस, स्मितल वाबळे, प्रा. संजय लाकुडझोडे, सतीश बोरुडे, बाळासाहेब जठार आणि झहीर जकाते उपस्थित होते.

या प्रकरणाबाबत खा. लंके यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी बाबासाहेब नागरगोजे आणि पोलिस उपअधीक्षक सुजितकुमार क्षीरसागर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून नाराजी व्यक्त केली. लोणीव्यंकनाथ येथील घटनेची न्याय्य पद्धतीने हाताळणी न करता दूषित हेतूने कारवाई झाल्याचा आरोप त्यांनी केला. खा. लंके म्हणाले, संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शासनाकडून उपलब्ध असलेली वैद्यकीय सेवा या निष्पाप चिमुरड्यांना दिली नाही. इतकेच नव्हे तर या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करून आंदोलकांवरच गुन्हे दाखल करण्यात आले. एखादा गुन्हा दाखल करण्यापूर्वी पोलीस अनेक बाजूंचा विचार करतात; मात्र या प्रकरणात पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी रात्री उशिरापर्यंत थांबून गुन्हा दाखल केल्यामुळे त्यांच्या भूमिकेबाबत संशय निर्माण होत असल्याचा आरोप त्यांनी केला. आंदोलनस्थळी जाऊन प्रथम आंदोलकांच्या भावना समजून घेणे आवश्यक होते. पोलीस अधिकाऱ्यांनी कोणाच्याही दबावाखाली किंवा हातचे बाहुले बनून काम न करता निष्पक्षपणे कर्तव्य पार पाडावे. आंदोलकांना लक्ष्य करण्याच्या भावनेतून कारवाई होणे लोकशाहीसाठी योग्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून डॉ. प्रशांत मुळे आणि डॉ. शैला डांगे यांच्यावर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणीही खा. लंके यांनी केली. अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ज्योती मांडगे यांनी घटनास्थळी भेट दिल्यानंतर चिमुरड्यांना वेळेत वैद्यकीय सेवा का मिळाली नाही, याची वस्तुस्थिती जाणून न घेता बेजबाबदार विधाने केल्याचा आरोपही त्यांनी केला. शासनाच्या १०२ रुग्णवाहिका सेवेसंदर्भातील परिपत्रक, संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांची नकारात्मक भूमिका आणि त्यातून दोन निष्पाप चिमुरड्यांचा झालेला मृत्यू हा अत्यंत गंभीर विषय असून हा संपूर्ण मुद्दा संसदेत मांडणार आहे, असे खा. नीलेश लंके म्हणाले.

## श्रीरामपुरात प्रेमविवाहाचा हायव्होल्टेज ड्रामा

राहिल्याने हा थरार अनेक नागरिकांनी पाहिला. काही नागरिक व दुचाकीस्वारांनी कारचा पाठलाग करून सय्यदबाबा चौकाजवळ वाहन थांबवले. त्यानंतर संतप्त नातेवाईकांनी कारची काच फोडून संताप व्यक्त केला. सुरुवातीला महिलेचे अपहरण झाल्याची अफवा पसरली होती. मात्र, पोलिस घटनास्थळी दाखल झाल्यानंतर सर्व संबंधितांना पोलिस ठाण्यात नेण्यात आले.

या संपूर्ण घटनेमुळे काल, सकाळी श्रीरामपूर शहरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## विकासकामे वेळेत अन् दर्जेदार पूर्ण करा

महाविद्यालयाच्या कामाची पाहणी केली. पशुवैद्यकीय शिक्षण आणि संशोधनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या प्रकल्पामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार असून पशुसंवर्धन क्षेत्रालाही नवी दिशा मिळणार आहे.

महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीचे काम, विविध शैक्षणिक विभाग, प्रयोगशाळा, प्रशासकीय इमारत, विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधा तसेच इतर पूरक बांधकामांची प्रगती त्यांनी प्रत्यक्ष पाहून अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली.

यानंतर डॉ. विखे पाटील यांनी एमआयडीसी परिसरात सुरू असलेल्या आयटीआय महाविद्यालयाच्या इमारत बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी केली. औद्योगिक क्षेत्राच्या वाढत्या गरजेनुसार कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी आधुनिक तांत्रिक शिक्षणाची आवश्यकता असून, या आयटीआय महाविद्यालयामुळे परिसरातील युवकांना दर्जेदार कौशल्य प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर स्थानिक रोजगारनिर्मितीला चालना मिळून उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ सहज उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. यावेळी त्यांनी इमारतीच्या बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेत गुणवत्तेबाबत आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकारी व ठेकेदारांना दिल्या.

त्यानंतर डॉ. विखे पाटील यांनी एमआयडीसी परिसरातील पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी उभारण्यात आलेल्या पंपिंग स्टेशनची पाहणी केली. औद्योगिक विकासासाठी सातत्यपूर्ण आणि पुरेसा पाणीपुरवठा अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगत त्यांनी पंपिंग स्टेशनची कार्यक्षमता, यंत्रसामग्रीची स्थिती, भविष्यातील पाण्याची गरज आणि देखभाल व्यवस्थेचा आढावा घेतला. उद्योगांना कोणत्याही परिस्थितीत पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यानंतर डॉ. विखे पाटील यांनी ग्रामस्थ व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह सावळी विहीर खुर्द एमआयडीसी परिसराची सविस्तर पाहणी केली. औद्योगिक वसाहतीतील अंतर्गत रस्ते, गटार व्यवस्था, सांडपाणी निचरा, स्वच्छता, अतिक्रमण, वीज, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत सुविधांचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला. अनेक ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था, पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्या तसेच गटार व्यवस्थेतील त्रुटी निदर्शनास आल्या. ग्रामस्थांनी विविध अडचणी मांडत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. या पाहणी दौऱ्यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी, अभियंते, ठेकेदार, ग्रामस्थ आणि स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १५ वर्षीय अल्पवयीन मुलीची आत्महत्या

उपचारासाठी राहुरी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. साक्षीच्या पश्चात आई, वडील आणि दोन भाऊ असा परिवार आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, राहुरी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# कर्जतला सत्र न्यायालयासाठी हालचालींना वेग

## नागरिकांना न्याय मिळण्याची आशा पल्लवित; सभापती शिंदे यांचा पाठपुरावा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जत व जामखेड तालुक्यातील नागरिकांना न्यायदानाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद व्हावी, या उद्देशाने कर्जत येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय सुरू करण्याच्या मागणीला आता वेग आला आहे.

या संदर्भात कर्जत तालुका वकील संघाच्या शिष्टमंडळाने मुंबई येथील ज्ञानेश्वरी निवासस्थानी भेट घेऊन निवेदन सादर केले असून, शासन स्तरावर सकारात्मक हालचाली सुरू झाल्याने नागरिकांमध्ये आशावाद निर्माण झाला आहे. या शिष्टमंडळामध्ये कर्जत तालुका वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड. कैलास शंकरराव शेवाळे, उपाध्यक्ष ॲड. दत्तात्रय चव्हाण, सचिव ॲड. अविनाश मते, ॲड. सचिन रेणुकर आणि ॲड. संदीप पाटील यांचा समावेश होता.

त्यांनी कर्जत येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय मंजूर करण्याबाबत सविस्तर निवेदन सादर करून या मागणीची आवश्यकता पटवून दिली. शिष्टमंडळाच्या मागणीची सकारात्मक दखल घेत, संबंधित प्रस्ताव मुख्यमंत्री स्तरावर पाठपुरावा करून शासनातील आवश्यक प्रक्रिया पूर्ण करत मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल तसेच न्यायालयाला लवकरात लवकर मंजुरी मिळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन यावेळी देण्यात आले. कर्जत येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय सुरू झाल्यास न्यायप्रक्रिया अधिक वेगवान होण्यास मदत होणार असून, नागरिकांना दूरवर प्रवास करण्याची वेळ वाचेल. त्यामुळे दोन्ही तालुक्यांतील नागरिकांकडून या मागणीला मोठा पाठिंबा मिळत असून, शासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### सातत्याने पाठपुरावः ॲड. शेवाळे

या संदर्भात बोलताना कर्जत तालुका वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड. कैलास शेवाळे यांनी सांगितले की, ''कर्जत येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय सुरू व्हावे, ही अनेक वर्षांची तालुकावासीयांची मागणी आहे. यापूर्वीही आम्ही या प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे. आता विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी या विषयात स्वतः लक्ष घालण्याचे आश्वासन दिल्याने हा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे.

# गुरुपौर्णिमेसाठी संगमनेरहून नारायणपूरकडे १५ जादा एसटी

## दत्तभक्तांच्या प्रवासाची विशेष सोय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : गुरुपौर्णिमेनिमित्त पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील श्रीक्षेत्र नारायणपूर येथे होणाऱ्या भव्य उत्सवासाठी संगमनेर तालुक्यातील दत्तभक्तांची गैरसोय होऊ नये, यासाठी संगमनेर आगाराने १५ जादा एसटी बसगाड्यांची व्यवस्था केली आहे. त्यामुळे तालुक्यातील भाविकांना सुरक्षित आणि सुलभ प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.



श्रीक्षेत्र नारायणपूर येथे परमपूज्य विश्वचैतन्य सद्गुरू नारायण महाराज यांच्या कृपाशीर्वादाने तसेच परमपूज्य सद्गुरू टेंबे स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सर्वात मोठ्या गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी महाराष्ट्रासह देशभरातून लाखो भाविक नारायणपूर येथे दाखल होत असतात. संगमनेर तालुक्यातूनही दरवर्षी मोठ्या संख्येने दत्तभक्त दर्शनासाठी जात असल्याने यंदा वाढती गर्दी लक्षात घेऊन अतिरिक्त बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे.

संगमनेर आगाराच्या नियोजनानुसार ज्या गावातून किमान ५० ते ५५ प्रवासी उपलब्ध होतील, त्या गावातून स्वतंत्र एसटी बस सोडण्यात येणार आहे. जवळे कडलग, राजापूर, चिखली, गुंजाळवाडी, मंगळापूर, पेमगिरी, निमगाव पागा, प्रतापपूर, आश्वी, खळी, पिंपरी, जाखुरी, पिंपरणे आदी गावांसाठी विशेष बससेवेची व्यवस्था करण्यात आली आहे.

या विशेष बससेवेचा लाभ घेऊन भाविकांनी गुरुपौर्णिमा उत्सवासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संगमनेर-अकोले-सिन्नर-राहाता विभागाचे अध्यक्ष बापूसाहेब देशमुख यांनी केले आहे.

# निळवंडे शाळेतील मुलांचे घवघवीत यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने आयोजित केलेल्या एप्रिल २०२६ मधील पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इयत्ता चौथी व सातवी) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निळवंडे येथील मुलांनी घवघवीत यश मिळवले आहे.

शाळेचे मुख्याध्यापक रमेश निघूते यांच्या मार्गदर्शनाखाली वर्गशिक्षिका मंदा कडलग - गायकर, तुषार फल्ले, संजय एरंडे व शिष्यवृत्तीचे तज्ञ मार्गदर्शक अनिल कडलग यांनी केलेल्या नियोजनाला चांगले यश मिळाले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने नुकताच अंतरिम निकाल जाहीर केला असून शाळेतील तब्बल २२ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत. इयत्ता चौथीच्या वर्गातील पुनम गणेश आहेर (२५०), अक्षरा शाम पवार (२४६), यश नानासाहेब पवार (२४४), गौरी रावसाहेब पवार (२४२), स्वरा राजेंद्र पाचारणे (२२६), स्वरा सुधीर पवार (२२६), काव्या सतीश पवार (२१६), जीवन रोहिदास आहेर (२१४), साईश्वरी सोमनाथ आहेर (२०६), कृष्णा प्रकाश पवार (२०४), श्रेयस दत्तात्रय केरे (१९८), अनन्य विलास पवार (१७८), रुद्र सचिन सोनवणे (१७८), अनुष्का सुदाम उकिरडे (१४०), कैवल्य राजेंद्र केरे (१३८), सानिका संदीप पवार (१२६) तर सातवीच्या वर्गातील अनुज तुषार फल्ले (२५०), गायत्री रामनाथ केरे (२२६), सोहम बाळासाहेब पवार (२२०), प्रिया सतीश भोसले (१६२), आराध्या मुक्ताहरी दवंगे (१६०), पूर्वा दत्तात्रय केरे (१४२) गुण मिळवून परीक्षेत पात्र ठरले आहेत.

शिष्यवृत्तीचे तज्ञ मार्गदर्शक अनिल कडलग यांनी प्रत्येक रविवार व शाळेच्या सुट्टीच्या दिवशी जादा तास घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सातत्य, जिद्द, चिकाटी, मेहनत व सराव या पंचसूत्रीचा वापर करत विद्यार्थ्यांकडून प्रत्येक विषयाचे १५० पेक्षा जास्त पेपर सोडवून घेतले. त्यामुळेच शाळेतील विद्यार्थ्यांना घवघवीत यश प्राप्त झाले आहे.

# शेतीचा वीजपुरवठा सुरळीत करा

## नेताजी सोशल फाउंडेशनचे महावितरणला निवेदन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : कृषी वीजपुरवठ्यावर सुरू असलेल्या भारनियमनामुळे शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा मुद्दा उपस्थित करत नेताजी सोशल फाउंडेशन, पढेगाव यांच्या वतीने महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले. एजी (शेती) सिंगल फेज आणि तीन फेज वीजपुरवठ्यावरील भारनियमन तातडीने कमी करून पूर्ववत वीजपुरवठा सुरू करावा, अशी प्रमुख मागणी या निवेदनातून करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर, मातापूर, हरेगाव, भोकर, गणेशखिंड आदी उपकेंद्रांसह राहुरी, राहाता, संगमनेर आणि नेवासा परिसरातील कृषी फिडरवर मार्च महिन्यापासून सातत्याने भारनियमन सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या सिंचनावर परिणाम होत असून वाड्या-वस्त्यांवरील नागरिकांनाही संध्याकाळच्या वेळेत वीजविना राहावे लागत आहे.

महावितरणने २५ मे ते ४ जुलैदरम्यान तीन फेज वीजपुरवठा आठ तासांवरून सहा तासांपर्यंत मर्यादित केला होता. त्यानंतर आठ तासांचा पुरवठा सुरू झाला असला, तरी आपत्कालीन भारनियमनामुळे अनेक ठिकाणी पुन्हा तीन ते चार तास अतिरिक्त वीजपुरवठा खंडित होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यामुळे शेतीचे नुकसान होत असून मुलांच्या अभ्यासापासून दैनंदिन जीवनापर्यंत अनेक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे कृषी फिडरवरील नियमित भारनियमन थांबवावे, बेलापूर उपकेंद्रावरील सकाळचे लोडशेडिंग रद्द करावे, नेवासा-मातापूर नवीन ३३ केव्ही वीजवाहिनी तातडीने सुरू करावी आणि अत्यावश्यक परिस्थिती वगळता कृषी वीजपुरवठा खंडित करू नये, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

या वेळी नेताजी सोशल फाउंडेशन, पढेगाव यांच्या वतीने सेजल उद्योग समूहाचे अध्यक्ष जितेंद्र तोरणे यांच्यासह आशिष बनकर, लक्ष्मीकांत बनकर, बबनराव कांदळकर, भगवान तोरणे, सोनलकुमार तोरणे, अण्णासाहेब कांदळकर, विक्रम बनकर आणि मनोज पवार उपस्थित होते.

# कोहोंडीत भात लागवडीला वेग



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राजूर** : अकोले तालुक्यातील कोहोंडी -राजूर निळवंडे धरण परिसरात गेल्या काही दिवसांपासून संततधार पाऊस सुरू असून शेतकऱ्यांच्य भात लागवडीच्या कामांना वेग आला आहे. कळसुबाई-प्रवरा नदी खोऱ्यातही समाधानकारक पाऊस होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कोहोंडी गावातील प्रगतिशील शेतकरी सखाराम खंडू किरवे आणि प्रा. साहेबराव किरवे यांनी भात लागवडीची माहिती देताना सांगितले की, यंदा वेळेवर झालेल्या पावसामुळे रोपांची वाढ चांगली झाली असून लागवडीची कामे वेगाने सुरू आहेत. निळवंडे धरण परिसरात मुबलक पाणी उपलब्ध असल्याने आगामी हंगाम चांगला जाईल, अशी आशा शेतकऱ्यांनी व्यक्त केली. यंदाचा पाऊस आणि अनुकूल हवामानामुळे भात पिकाचे उत्पादनही समाधानकारक होईल, असा विश्वास शेतकरी व्यक्त करत आहेत. सध्या परिसरात सर्वत्र हिरवाई पसरली असून शेतीची लगबग पाहायला मिळत आहे.

# प्रा. जोशी यांच्याकडून बाल वारकऱ्यांना मार्गदर्शन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्री क्षेत्र रेणुका देवी आश्रमात माऊली वृद्धाश्रमातील बाल वारकरी आणि शालेय विद्यार्थ्यांनी काढलेल्या बाल दिंडी सोहळ्याचे अतिशय उत्साहात स्वागत करण्यात आले. या प्रसंगी श्री रेणुका देवी आश्रमाचे विश्वस्त प्रा. आदिनाथ जोशी यांनी उपस्थित बाल वारकऱ्यांना 'गुरु-शिष्य परंपरेचे' महत्त्व सांगत सखोल मार्गदर्शन केले. दिंडी आश्रमात पोहोचताच अदिती जोशी यांच्या हस्ते बाल वारकऱ्यांचे मंगल औक्षण करून स्वागत करण्यात आले व सर्वांना अल्पोपाहार वाटप करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान आश्रमाचे व्यवस्थापक दत्तात्रेय खिलारी यांनी प्रा. आदिनाथ जोशी सरांच्या आध्यात्मिक व शैक्षणिक जीवनाचा पट उपस्थितांसमोर मांडला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शुभम नामेकर, लक्ष्मणराव पिसे, भाऊसाहेब गायकवाड आणि भाऊसाहेब राऊत साई कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले. व्यवस्थापक दत्तात्रेय खिलारी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# 'शेतपाणंद' वर पाच जणांची निवड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजना विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या सदस्यपदी संगमनेर मतदारसंघातील. बादशाह गुंजाळ,. संपत फड. म्हतु शेरमाळे, राजाभाऊ वर्पे आणि. सुनिल शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचणारे रस्ते बारमाही, दर्जेदार आणि सुकर करण्यावर भर दिला जात आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती महत्त्वाची भूमिका बजावणार असून, स्थानिक गरजा लक्षात घेऊन प्राधान्याने रस्त्यांची निवड, कामांच्या गुणवत्तेवर देखरेख व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी या समितीवर असेल. संगमनेर मतदारसंघ हा कृषिप्रधान भाग असल्याने शेतपाणंद रस्त्यांचे जाळे मजबूत होणे ही काळाची गरज आहे. पावसाळ्यात शेतकऱ्यांना शेत माल वाहतूक, खते -बियाणे पोहोच करणे तसेच कृषी यंत्रसामग्री ने-आण करण्यासाठी अमेक मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमी वर समितीच्या माध्यमा तून रस्त्यांच्या कामांना गती मिळेल अन शेतकर्यांचे दैनंदिन जीवन अधिक सुलभ होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. नवनियुक्त सदस्यांनी शासनाच्या उद्दिष्टांनुसार पारदर्शक व गुणवत्ता पूर्ण कामांना प्राधान्य देत शेतकरी हिताचे निर्णय घेण्याची ग्वाही दिली आहे.

# झेरॉक्सच्या नावाखाली शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक?

## भूमिअभिलेख कार्यालयातील प्रकार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**चिचोंडी** : शेतकऱ्यांच्या जमिनीशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे मिळविण्यासाठी अहिल्यानगर येथील भूमिअभिलेख कार्यालयात येणाऱ्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सरकारने निश्चित केलेले कायदेशीर शुल्क भरल्यानंतरही झेरॉक्सच्या नावाखाली अतिरिक्त पैसे मोजावे लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

विशेष म्हणजे, या रकमेची कोणतीही अधिकृत पावती दिली जात नसल्याने शासकीय कार्यालयातील आर्थिक व्यवहारांच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

भूमिअभिलेख कार्यालयात महत्त्वाच्या रेकॉर्ड रूममध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मात्र, नागरिकांची कामे ज्या कर्मचारी कक्षांमध्ये होतात, त्या ठिकाणी सीसीटीव्ही व्यवस्था नसल्याचे दिसून येते. त्यामुळे व्यवहारातील पारदर्शकता, जबाबदारी आणि नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. कर्मचारी कक्षांमध्ये सीसीटीव्ही का बसविण्यात आले नाहीत, याबाबत प्रशासनाने खुलासा करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

कार्यालयात येतात. आवश्यक शुल्क भरूनही झेरॉक्सच्या नावाखाली रोख रक्कम घेतली जात असल्याचे दिसून येत आहे. मात्र, या व्यवहाराची कोणतीही अधिकृत पावती शेतकऱ्यांना दिली जात नसल्याने नेमके कोणत्या नियमांनुसार ही रक्कम आकारली जाते, याबाबत संभ्रमाचे वातावरण आहे.

शेतकरी दिवसभराची मजुरी बुडवून, प्रवास खर्च करून आणि वेळ खर्चुन कार्यालयात येतात. अशा परिस्थितीत कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त रक्कम भरावी लागत असल्याने त्यांच्या आर्थिक अडचणीत अधिक भर पडत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# शिर्डी- डोहाळे रस्ता समस्यांच्या विळख्यात

## तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : शिर्डीलगत असलेल्या शिर्डी ते डोहाळे हा पाच किलोमीटरचा रस्ता अतिशय खराब झाला असून रस्त्याची पूर्ण चाळण झाली आहे. ठिकठिकाणी पडलेले खड्डे आणि खराब झालेला रस्ता यांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. साईबाबा संस्थानच्या माध्यमातून लाइट पोल उभे करण्यात आले असले, तरी त्यांना लाइट कनेक्शन दिलेले नाही. यामुळे या रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या रस्त्याच्या विविध समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे व खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी लक्ष देण्याची गरज असून हे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी शिर्डी येथील सामाजिक कार्यकर्ते सतीश गंगवाल यांच्यासह परिसरातील ग्रामस्थांनी एका पत्रकाद्वारे केली आहे.

पत्रकात म्हटले, की खराब रस्ता, खड्ड्यांमुळे झालेली चाळण, अंधाराचे साम्राज्य आणि वाढलेल्या वेड्या बाभळी यामुळे नागरिक त्रस्त आहेत. साईबाबा संस्थानच्या माध्यमातून लाखो रुपये खर्च करून काही वर्षांपूर्वी पोल उभे करण्यात आले, मात्र लाइट न जोडल्यामुळे हा खर्च वाया गेला आहे. यामुळे अंधाराचे जाळे तयार झाले आहे. याच मार्गाने मुंबई व सुरत भागांतील अनेक साई पदयात्री दिंड्या घेऊन शेकडो किलोमीटर पायी शिर्डीला येतात.

या दुरवस्थेमुळे भाविकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. तसेच रोजगारासाठी रात्री-बेरात्री येणारे साईबाबा संस्थानचे कामगार, शेतकरी व ग्रामस्थ यांनादेखील मोठा त्रास सहन करावा लागत आहे. कुंभमेळ्याच्या अनुषंगाने या रस्त्याचे काम जलद गतीने आणि युद्धपातळीवर पूर्ण करावे, अशी मागणी परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्ते सतीश गंगवाल यांनी केली आहे.

# पशूखाद्याचे भाव गगनाला; गोपालक अडचणीत

## शासनाने भाव नियंत्रण न आणल्यास आंदोलनाचा इशारा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : शासकीय आणि खासगी पातळीवर दुधाच्या दरात अवघी १ ते २ रुपयांची वाढ झाली, की पशुखाद्य उत्पादक कंपन्यांकडून पोत्यामागे थेट २०० ते ४०० रुपयांची दरवाढ केली जाते. दुधाचे भाव वाढूनही पशूशुखाद्याच्या अवाजवी दरवाढीमुळे दूध उत्पादक शेतकरी मात्र आजही तोट्यातच आहे. दूध धंदा आधीच संकटात असताना खाद्य उत्पादकांकडून शेतकऱ्यांची उघड लूट सुरू असून, या खाद्याच्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने तत्काळ कडक बंधने घालावीत, अशी आक्रमक मागणी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. शासनाने यावर तातडीने निर्णय न घेतल्यास दूध उत्पादक शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा प्रदेश अध्यक्ष गुणवंत आठरे यांनी पत्रकाद्वारे दिला आहे.

पशुखाद्य उत्पादक कंपन्यांवर आणि त्यांच्या विक्री दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाची कोणतीही प्रभावी यंत्रणा सध्या अस्तित्वात नाही. कंपन्या स्वतःच्या फायद्यासाठी मनमानी पद्धतीने दर ठरवत असून, शेतकऱ्यांची लूट करत आहेत. त्यामुळे शासनाने पशुखाद्य विक्रीबाबत आणि दरांबाबत निश्चित नियमावली तयार करून किंमत नियंत्रणात ठेवण्यासाठी कडक बंधने घालणे अत्यंत आवश्यक आहे, तरच दूध उत्पादक शेतकऱ्यांना खरा दिलासा मिळू शकेल. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी परिषदेने शासनाला इशारा दिला आहे की, शासनाने गांभीर्याने विचार करून तातडीने प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी.

### कंपन्यांची मनमानी खपवून घेणार नाही !

हवामान बदल आणि अस्मानी-सुलतानी संकटांशी लढून शेतकरी पुन्हा एकदा दूध व्यवसायाकडे वळू पाहत आहे. पशूखाद्य कंपन्या खाद्याचे भाव वाढवून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. ही सरळ सरळ लूट असून शासनाने यावर त्वरित किंमत नियंत्रण आणले पाहिजे. जर शासनाने या पशूखाद्य उत्पादकांवर कायदेशीर बंधने घातली नाहीत, तर पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी परिषद संपूर्ण राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना सोबत घेऊन याविरोधात तीव्र आंदोलन छेडेल.

# संगमनेरमध्ये साकारणार सैनिकांच्या शौर्याचा इतिहास

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात; स्वातंत्र्य सैनिक स्मारकासाठी कारखान्याकडून ४२ गुंठे जागा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालेल्या प्रत्येक लढाईमध्ये सैनिकांनी मोठे योगदान दिले आहे. देशाच्या संरक्षणासाठी लढणाऱ्या सैनिकांचे प्रत्येक भारतीय नागरिकाच्या जीवनामध्ये मोठे आदराचे स्थान आहे. संगमनेरमध्ये स्वातंत्र्य सैनिकाचे सुंदर स्मारक व्हावे, याकरता सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने ४२ गुंठे जागा दिली जाणार असल्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे. मालपाणी लॉन्स येथे स्वराज्य सैनिक कल्याण संस्थेच्या वतीने कारगिल दिनाच्या निमित्ताने वीरमाता, वीरपत्नी व समाजभूषण पुरस्कारानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर मा. आ. डॉ. सुधीर तांबे, रामहरी कातोरे, मेजर भाऊसाहेब पोखरकर, तालुकाध्यक्ष प्रकाश कोटकर, कॅप्टन सुभाष कुडेकर, सुनील थोरात, प्रा. बाबा खरात, किसन हासे, जितेश लोढा, युवराज गांजवे, रोहिणी कोटकर यांच्यासह स्वराज्य सैनिक कल्याण समितीचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

माजीमंत्री थोरात म्हणाले की, कारगिलचा विजय हा इतिहासातील महत्त्वाचा दिवस आहे. पाकिस्तानी कुरापती केल्या त्याविरुद्ध सैनिकांनी अत्यंत कठीण परिस्थितीत लढून हा विजय मिळवला. या युद्धात पाकिस्तानी सैनिक डोंगरावरून लढत होते आणि आपल्याला खालून लढावे लागले. त्यामुळे अडचणी होत्या तरीही भारतीय सैन्याने विजय मिळवला हे आपल्यासाठी अभिमानास्पद आहे.

भारतीय सैनिक काश्मीरसारख्या सीमा भागामध्ये ऊन, वारा, पाऊस, थंडीमध्ये रात्रंदिवस पहारा करतात म्हणून देशाचे नागरिक शांत झोपू शकतात. देशाच्या रक्षणाकरता अनेक सैनिकांनी त्याग, बलिदान केला आहे. या सर्वांप्रती देशवासीयांना सदैव कृतज्ञता आणि अभिमान आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात पहिले महायुद्ध व दुसऱ्या महायुद्धातही भारतीय सैनिकांनी मोठे शौर्य दाखवले. स्वातंत्र्यानंतर पाकिस्तान बरोबर आणि चीन बरोबर झालेल्या युद्धात भारतीय सैन्याने विजय मिळवला. व्हिक्टोरिया क्रॉस नामदेवराव जाधव हे आपल्या सर्वांसाठी अभिमानास्पद व्यक्तिमत्व आहे. त्यांचे स्मारक संगमनेरमध्ये व्हावे याकरता स्वराज्य सैनिक समितीच्या वतीने सातत्याने पाठपुरावा सुरू होता.

### वीर मातांसह वीर पत्नींचा गौरव

डोंगरगाव येथील हरिभाऊ उगले हे संत गाडगेबाबा यांच्या विचाराने प्रेरित होऊन स्वच्छतेचे व अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करतात. त्यांचा समाजभूषण पुरस्काराने गौरव हा योग्य व्यक्तीचा गौरव असून त्यांना मानपत्र व समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तर वीरपत्नी वैशाली बडे, वीरपत्नी वर्षा घोडेकर, वीरपत्नी सुरेखा पवार, वीरपत्नी मनीषा गुंजाळ, वीरपत्नी मंगल वलटे, वीरपत्नी सिंधुताई मनसुख आणि वीरमाता लहानुबाई ढगे यांना माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# कर्जतमध्ये कारगिल विजय दिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** जय जवान आजी-माजी सैनिक सेवा फाउंडेशन, कर्जत आणि विविध सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने २७ वा कारगिल विजय दिवस कर्जत शहरात देशभक्तीपूर्ण वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कारगिल युद्धातील अमर शहीदांना अभिवादन, भव्य तिरंगा रॅली, आजी-माजी सैनिकांचा सन्मान आणि वृक्षारोपण अशा विविध उपक्रमांद्वारे शहीदांच्या बलिदानाला सलाम करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात कर्जत येथील हुतात्मा स्मारकावर कारगिल युद्धातील शहीदांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. त्यानंतर हुतात्मा स्मारक ते कारगिल शहीद स्मृती उद्यान अशी भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. रॅलीचा समारोप कारगिल शहीद स्मृती उद्यानात झाला. येथे सर्व सामाजिक संघटनांच्या वतीने आजी-माजी सैनिकांचा मानाचा फेटा बांधून व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. तसेच कारगिलच्या शहीदांच्या स्मृतीप्रित्यर्थ वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. नगराध्यक्षा छायाताई शेलार यांनी भारतीय सैनिकांचे शौर्य, त्याग आणि राष्ट्रसेवेचे महत्त्व अधोरेखित करत सैनिकांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

जय जवान आजी-माजी सैनिक सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष मेजर भाऊसाहेब रानमाळ यांनी कारगिल युद्धातील अनुभव कथन करत भारतीय सैन्याच्या अदम्य शौर्याची माहिती दिली.

# निष्काळजीपणामुळे शेतकऱ्याचा बळी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** तालुक्यातील डमाळवाडी येथे शेतातील बांधावर टाकलेल्या जिवंत वीजवाहक केबलचा ट्रॅक्टरला स्पर्श झाल्याने पेरणी करत असलेल्या तरुण शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणी तिघांविरुद्ध पाथर्डी पोलिस ठाण्यात सदोष मनुष्यवधासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्ञानदेव रावसाहेब डमाळे (वय ३८, रा. डमाळवाडी, ता. पाथर्डी) हे ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतात पेरणीचे काम करत होते. त्यावेळी शेजारील शेताच्या बांधावर टाकलेल्या जिवंत वीजवाहक केबलचा ट्रॅक्टरला स्पर्श झाल्याने त्यांना जोरदार विद्युत धक्का बसला.

गंभीर जखमी झालेल्या ज्ञानदेव डमाळे यांना तातडीने अहिल्यानगर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या घटनेप्रकरणी मृताचे भाऊ बाबासाहेब रावसाहेब डमाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रामचंद्र बाबासाहेब डमाळे, श्यामसुंदर बाबासाहेब डमाळे आणि चैतन्य रामचंद्र डमाळे (सर्व रा. डमाळवाडी, ता. पाथर्डी) यांच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधासह संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, संबंधितांनी शेताच्या बांधावर जिवंत वीजवाहक केबल टाकून ठेवली होती.

त्यामुळे कोणाच्याही जीविताला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, याची जाणीव असूनही त्यांनी निष्काळजीपणा केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या निष्काळजीपणामुळेच ज्ञानदेव डमाळे यांचा मृत्यू झाल्याचे फिर्यादीत म्हटले असून, या प्रकरणाचा पुढील तपास पाथर्डी पोलिस करत आहेत.

# ‘पैस’ खांबाच्या दर्शनासाठी भाविकांचा जनसागर

## ९ ऑगस्टला भरणाऱ्या कामिका एकादशी यात्रेची पूर्वतयारी सुरू



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** संत ज्ञानेश्वर महाराजांची पावन कर्मभूमी आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे रचनास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र नेवासा येथे आषाढी एकादशीचा सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला. माऊली, माऊलीचा गजर आणि टाळ-मृदंगाच्या तालावर संत ज्ञानेश्वर माऊलींचे मूर्तिमंत रूप मानल्या जाणाऱ्या पवित्र पैस खांबाचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी अलोट गर्दी केली होती. पहाटेपासूनच सुरू झालेल्या भाविकांच्या रांगांमुळे संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

आषाढी एकादशीनिमित्त पहाटे ४ वाजता देवस्थानचे प्रमुख महंत वेदांताचार्य ह.भ.प. देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली वेदमंत्रांच्या जयघोषात पैस खांबास महाअभिषेक करण्यात आला.

यावेळी रामकृष्ण हरी प्रभात फेरीचे मार्गदर्शक अनंता नळकांडे, सविता नळकांडे, विनोद नळकांडे, सुवर्णा नळकांडे आणि श्रीमती सत्वशीला दिगंबर नळकांडे यांच्या हस्ते महापूजा संपन्न झाली.

या सोहळ्याप्रसंगी देवस्थानचे जनसंपर्क अधिकारी माऊली सेवेकरी आशिष कावरे, विष्णू जाधव, गोरख भरत शेळके व वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी उपस्थित होते. दिवसभरात आलेल्या भाविकांच्या सेवेसाठी देवस्थानचे अध्यक्ष माजी आ. पांडुरंग अभंग, विश्वासराव गडाख, ज्ञानेश्वर शिंदे, रामभाऊ जगताप, आशिष कावरे, योगेश रासने तत्पर होते.

### कामिका एकादशी सोहळ्याची जोरदार तयारी

आषाढी एकादशीचा सोहळा पार पडल्यानंतर आता नेवासा येथे दि. ९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या कामिका एकादशी सोहळ्याची वेगाने तयारी सुरू झाली आहे. या कामिका एकादशीला माऊलींच्या दर्शनासाठी लाखो भाविक येण्याची शक्यता असल्याने देवस्थान व स्थानिक प्रशासनाकडून यात्रेचे नियोजन आणि पूर्वतयारी जोरात केली जात आहे.

# शिक्षणासोबत संस्कारांची जोपासना आवश्यक

## स्नेहल शेळके; समर्थ गुरुकुलच्या भव्य बालदिंडीत वारकरी संस्कृतीचे दर्शन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची ओळख आहे. आधुनिक शिक्षणाबरोबर भारतीय संस्कृती, अध्यात्म, नैतिक मूल्ये आणि संस्कारांची जोपासना झाली तरच चारित्र्यसंपन्न, राष्ट्राभिमानी आणि जबाबदार पिढी घडेल, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या स्नेहल शेळके यांनी केले.

बांगरवाडी येथील समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ गुरुकुलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त भव्य बालदिंडी सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बोलत होत्या.

संस्थेच्या संचालिका सारिका शेळके, स्नेहल शेळके आणि कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत यांच्या हस्ते दिंडी पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. वारकरी वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी साकारलेल्या रूपांनी उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्य सतीश कुऱ्हे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा संचालक हरिश्चंद्र नरसुडे व सखाराम मातेले यांनी केले. सूत्रसंचालन शितल पाडेकर यांनी, प्रास्ताविक दिपाली नवले यांनी तर आभार प्रीती जाधव यांनी मानले.

### कार्यक्रमास दिग्गजांची उपस्थिती

संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, मीराताई शेळके, प्राचार्या वैशाली आहेर, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर, सर्व विभागांचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘स्वामी चरित्र’ ग्रंथाचे २७ हजार पारायण



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** येथील बोल्हेगाव फाटा परिसरातील स्वामी समर्थ केंद्रात (दिंडोरी प्रणित) रविवारी ( ता. २६ जुलै) सकाळी ८ ते ११ या वेळेत स्वामी चरित्र या ग्रंथाचे तब्बल २७ हजार पारायण पार पडले. राज्याच्या अध्यात्मिक क्षेत्रातील एकाच दिवसाच्या पारायणाचा हा उच्चांक मानला जातो.

केंद्राचे प्रमुख चंद्रशेखर (काका) लोळगे यांच्या नेतृत्वाखालील टीमने हा अभिनव उपक्रम यशस्वी केला. आज सकाळी सात वाजल्यापासूनच केंद्राकडे येणारे सर्व रस्ते गर्दीने फुलून गेले होते. पारायणासाठी आलेल्या भाविकांसाठी भव्यदिव्य मंडपात प्रशस्त बैठक व मोठी पार्किंग व्यवस्था करण्यात आली होती. सकाळी आठ वाजता एका सेवेकरी जोडप्याच्या हस्ते स्वामी समर्थांची आरती होवून पारायण सोहळ्याला सुरुवात झाली. तीन टप्प्यांमध्ये प्रत्येकी नऊ हजार याप्रमाणे एकंदर २७ हजार पारायण निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात आले. या केंद्राला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने २५ हजार पारायण पूर्ण करण्याचा संकल्प करण्यात आला होता. तथापि, प्रत्यक्षात मात्र हा आकडा २७ हजारांपर्यंत गेला.

# समाजसेवेने साजरा झाला मुंडेंचा वाढदिवस

## मतिमंद विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन, वृक्षारोपण व गोमातेला चारा वाटप



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने पाथर्डी येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. मतिमंद व अनाथ विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन, वृक्षारोपण तसेच गोमातेला चारा वाटप करून वाढदिवस समाजसेवेच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.

यावेळी मतिमंद विद्यार्थ्यांसमवेत वाढदिवस साजरा करत त्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले. कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर नारळाच्या रोपाचे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच गोशाळेत जाऊन गोमातेला चारा वाटप करून सेवाभावाची परंपरा जपण्यात आली.

जगदंब युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ॲड. प्रतिक खेडकर यांनी, वाढदिवस हा केवळ शुभेच्छांचा दिवस नसून समाजाप्रती बांधिलकी व्यक्त करण्याची संधी आहे. गरजूंना मदत, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक उत्तरदायित्व ही प्रत्येकाने जोपासावीत, असे सांगितले. मुकुंद गर्जे यांनी, समाजहिताचे उपक्रम राबविणे हीच खरी लोकसेवा असून पंकजाताईंच्या प्रेरणेतून युवा कार्यकर्ते समाजासाठी काम करत आहेत, असे मत व्यक्त केले.

> स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे पाथर्डी तालुक्यावर विशेष प्रेम होते. त्याच विचारांचा वारसा ना. पंकजा मुंडे समर्थपणे पुढे नेत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आ. मोनिका राजळे पाथर्डीच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. समाजसेवेच्या माध्यमातून वाढदिवस साजरा करणे हीच खरी मानवंदना आहे.
>
> **– अमोल गर्जे, नगरसेवक**

# सैनिक स्मारकासाठी २० लाखांचा निधी देणार

## आ. खताळ; कारगिल विजय दिनानिमित्त माजी सैनिकांचा गौरव



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** कारगिल विजय दिनानिमित्त संगमनेर येथे स्वराज्य सैनिक कल्याण संस्थेच्या वतीने विविध देशभक्तीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी सैनिक स्मारक उभारणीसाठी जागेचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर स्मारकासाठी आपल्या आमदार निधीतून २० लाख रुपयांचा निधी देण्यात येईल, अशी घोषणा आ. अमोल खताळ यांनी केली.

मालपाणी लॉन्स येथे झालेल्या या कार्यक्रमात कारगिल विजय रॅली, शौर्यगाथांचे कथन, देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण, वृक्षारोपण, तसेच वीर नारी आणि वीर मातांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

शाळकरी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विविध स्पर्धांतील विजेत्यांना आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

यावेळी स्वराज्य सैनिक कल्याण संस्थेचे संस्थापक भानुदास पोखरकर, अध्यक्ष प्रकाश कोटकर, उपाध्यक्ष कॅप्टन सुभाष कुडेकर, कार्याध्यक्ष सुनील थोरात, सचिव प्रवीण गुंजाळ, कारगिल योद्धा लक्ष्मण ढोले, भारत कुटे, गिरीश एरंडे, कुंडलिक कर्पे, आनंदा गीते यांच्यासह तालुक्यातील माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले, मी केवळ बोलणारा नाही, तर कृतीतून काम करणारा आहे. सैनिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी मी सदैव त्यांच्या पाठीशी उभा राहीन.

> २०१४ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या सन्मानासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. जगभर युद्धजन्य परिस्थिती निर्माण होत असतानाही भारतीय सैन्याने देशाच्या सीमा सक्षमपणे सुरक्षित ठेवल्या असून, त्यामुळे भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाचीही हिंमत होत नाही. हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा विषय आहे.
>
> **– अमोल खताळ, आमदार**

# बसच्या श्रेयावरून भाजप-राष्ट्रवादी आमनेसामने

## पाथर्डीत नव्या बीएस-६ एसटी बसेसचे पूजन; पाठपुराव्यावरून दोन्ही पक्षांचे दावे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पाथर्डी आगारात दाखल झालेल्या पाच नव्या बीएस-६ बसांचे रविवारी सकाळी नवीन बसस्थानक परिसरात पूजन करण्यात आले. आषाढी एकादशीनिमित्त या बस शनिवारीच पंढरपूरकडे सेवेसाठी रवाना करण्यात आल्याने पूजनाचा कार्यक्रम रविवारी आयोजित करण्यात आला. बस मंजुरीच्या श्रेयावरून भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये दावे-प्रतिदावे झाले. मात्र, कार्यक्रम शांततेत आणि सामंजस्याने पार पडला.

आगार व्यवस्थापक अमित बनसोडे यांच्या आयोजनाखाली झालेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ प्रवाशांच्या हस्ते फीत कापून बसांचे लोकार्पण करण्यात आले. नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी बसांचे पूजन केले. त्यानंतर दोन्ही पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते एकाच व्यासपीठावर सहभागी झाले. नव्या बस लवकरच तालुक्यातील विविध स्थानिक मार्गांवर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत.

यावेळी नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी आ. मोनिका राजळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पाथर्डी आगाराला आतापर्यंत १५ नवीन बस मिळाल्या असून त्यापैकी पाच बस आता सेवेत दाखल झाल्याचे सांगितले. तसेच विधान परिषदेचे आमदार शिवाजी गर्जे यांचेही सहकार्य लाभल्याचे नमूद केले. पाथर्डीतील जुने व नवीन बसस्थानकाच्या सुशोभीकरणासाठीही आमदार राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड. अंकुश गर्जे यांनी एसटी महामंडळाचे कायदेशीर सल्लागार म्हणून काम केल्यामुळे महामंडळाच्या कामकाजाची माहिती असल्याचे सांगत, विधान परिषदेचे आ. शिवाजी गर्जे यांनी परिवहन विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करून या बस उपलब्ध करून दिल्याचा दावा केला.

### आ. राजळे यांच्या पाठपुराव्याला यश

शेवगाव आणि पाथर्डी आगारासाठी प्रत्येकी दहा नवीन बस उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार मोनिका राजळे यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सातत्याने केली होती. त्यानुसार पहिल्या टप्प्यात शेवगाव आगाराला पाच, तर त्यानंतर पाथर्डी आगारालाही पाच नवीन बीएस-६ राजमाता जिजाऊ बस मिळाल्या. यापूर्वीही त्यांच्या प्रयत्नांतून पाथर्डी आगाराला दहा नवीन बस मिळाल्या असून उर्वरित बसही लवकरच उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. नव्या बसांमुळे ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक सुविधायुक्त प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

# तुळशीच्या माळांमधून जपला वारकरी भाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भातकुडगाव फाटा :** शेवगाव-नेवासा राजमार्गावरील भातकुडगाव फाटा चौफुल्यावर हॉटेल व्यवसाय करणारे परसरामभाऊ फटांगरे यांनी व्यवसायासोबतच समाजसेवा आणि सेवाभावाची अनोखी परंपरा जपली आहे. तुळशीच्या माळा स्वतः तयार करून वारकऱ्यांना उपलब्ध करून देणे, दररोज पहाटे कावळ्यांना अन्न-पाणी देणे तसेच आयुर्वेदिक औषधांच्या माध्यमातून गरजू आणि गरिबांना मदत करणे, असे विविध उपक्रम ते अनेक वर्षांपासून निस्वार्थपणे राबवत आहेत.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी तुळशीच्या पवित्र माळा स्वतः बनवून देण्याचा त्यांचा उपक्रम विशेष कौतुकास्पद ठरत आहे. वारकऱ्यांना सहज आणि विनामूल्य तुळशीच्या माळा उपलब्ध व्हाव्यात, या उदात्त हेतूने ते दरवर्षी हा उपक्रम राबवतात.

परसराम फटांगरे यांचा आणखी एक वेगळा छंद म्हणजे दररोज पहाटे कावळ्यांना अन्न व पाणी देणे. त्यांच्या एका हाकेवर अनेक कावळे जमा होतात आणि अन्न-पाणी ग्रहण करून पुन्हा आपल्या निवाऱ्याकडे परततात. हा देखावा पाहण्यासाठी अनेक प्रवासी तसेच शाळकरी विद्यार्थीही आवर्जून थांबतात.

# डॉक्टर-पोलिस बैठकीत स्त्रीरोगतज्ज्ञांची दांडी; शहरात चर्चांना उधाण

## एक ज्येष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ वगळता बहुतांश डॉक्टर गैरहजर; गर्भलिंग निदान प्रकरणाशी काही धागेदोरे?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : शहरातील डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाने पुढाकार घेत आयोजित केलेल्या संवाद बैठकीत विविध शाखांतील डॉक्टरांनी सहभाग घेतला. मात्र, एक ज्येष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ वगळता शहर व तालुक्यातील बहुतांश स्त्रीरोगतज्ज्ञांनी बैठकीकडे पाठ फिरवल्याने शहरात नव्या चर्चांना उधाण आले आहे. काही महिन्यांपूर्वी गाजलेल्या गर्भलिंग निदान प्रकरणाच्या चौकशीची पार्श्वभूमी आणि या बैठकीतील अनुपस्थिती यांचा काही संबंध आहे का, असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.



अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत डॉक्टरांना धमक्या, खंडणी, रुग्णांच्या नातेवाईकांकडून होणारा त्रास किंवा अन्य कोणत्याही गुन्हेगारी प्रकाराबाबत भीती न बाळगता पोलिसांकडे तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले. ''तक्रार करा, कारवाई निश्चित होईल,'' अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

बैठकीला डॉ. रविंद्र जगधने, डॉ. दिलीप शिरसाट, नेत्रतज्ज्ञ डॉ. संजय शेळके, डॉ. राहिंज, डॉ. देशपांडे, डॉ. सोमाणी, डॉ. बधे, डॉ. सौ. बधे, डॉ. शुक्ला, डॉ. कारवा, डॉ. चव्हाण यांच्यासह विविध शाखांतील डॉक्टर उपस्थित होते. शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांनीही डॉक्टरांशी संवाद साधला.

मात्र, शहरातील बहुतांश स्त्रीरोगतज्ज्ञ या बैठकीला अनुपस्थित राहिल्याचे विशेषत्वाने जाणवले. यामुळे वैद्यकीय क्षेत्रात तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये चर्चांना उधाण आले आहे.

*गर्भलिंग निदान प्रकरणाचा परिणाम?*

शहरात काही महिन्यांपूर्वी गाजलेल्या कथित गर्भलिंग निदान प्रकरणात शहरातील अनेक स्त्रीरोगतज्ज्ञांना चौकशीसाठी बोलावण्यात आले होते. त्या कारवाईनंतर वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली होती. त्यामुळे या बैठकीला बहुतांश स्त्रीरोगतज्ज्ञांनी गैरहजर राहण्यामागे त्या घटनेचा काही परिणाम आहे का, अशी चर्चा आता खुलेपणाने होऊ लागली आहे.

याबाबत पोलीस प्रशासन किंवा संबंधित डॉक्टरांकडून कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. त्यामुळे या अनुपस्थितीमागील कारणांविषयी विविध तर्क-वितर्क व्यक्त होत आहेत. डॉक्टर आणि पोलीस यांच्यात विश्वासाचे नाते अधिक मजबूत करण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीतच एका महत्त्वाच्या वैद्यकीय शाखेचा प्रतिसाद अत्यल्प राहिल्याने या बैठकीपेक्षा स्त्रीरोगतज्ज्ञांच्या अनुपस्थितीचीच अधिक चर्चा श्रीरामपूरमध्ये रंगू लागली आहे.

# संकल्प स्पोर्ट्स फाउंडेशनची राज्यस्तरावर दमदार झेप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लिंपणगाव** : अहिल्यानगर येथे वुशू असोसिएशन महाराष्ट्र आणि अहिल्यानगर वुशू असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धेत श्रीगोंदा तालुक्यातील संकल्प स्पोर्ट्स फाउंडेशनच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. संस्थेच्या सहा खेळाडूंनी पदके पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळविली.




स्पर्धेत नरेश राणा (सब-ज्युनिअर) याने सुवर्णपदक, यशराज शिवरकर (ज्युनिअर) याने रौप्यपदक, समर्थ राहिंज (ज्युनिअर) याने सुवर्णपदक, सार्थक कराळे (ज्युनिअर) याने रौप्यपदक, तर रोहित गायकवाड आणि देविदास गायकवाड (सिनिअर) यांनी सुवर्णपदके मिळवत राज्य स्पर्धेतील आपले स्थान निश्चित केले.

यशस्वी खेळाडूंना अहिल्यानगरचे आमदार संग्रामभैय्या जगताप आणि अहिल्यानगर वुशू असोसिएशनचे अध्यक्ष स्वप्निल वारुळे यांच्या हस्ते पदके व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक चंद्रकांत राहिंज यांचे मार्गदर्शन लाभले. ग्रामीण भागातील खेळाडूंनी राज्यस्तरीय निवड चाचणीत केलेल्या दमदार कामगिरीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, आगामी राज्य स्पर्धेसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# डॉ. अब्दुल कलामांच्या विचारांचा जागर

## त्रिमूर्ती महाविद्यालयात पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा फाटा** : भारतरत्न, माजी राष्ट्रपती आणि मिसाईल मॅन ऑफ इंडिया म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांच्या विचारांचा आदर्श स्वीकारत ज्ञान, विज्ञान आणि राष्ट्रसेवेच्या मार्गाने वाटचाल करण्याचा संकल्प केला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचा, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील योगदानाचा तसेच राष्ट्रपती म्हणून केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम घ्यावेत आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, हा त्यांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

उपप्राचार्या प्रा. निकिता बर्गे यांनी विद्यार्थ्यांनी ज्ञान, संशोधन, नवोपक्रम आणि वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासत डॉ. कलाम यांच्या विचारांचे अनुकरण करावे, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे यांनी साधेपणा, प्रामाणिकपणा, देशभक्ती आणि राष्ट्रसेवा हीच डॉ. कलाम यांची खरी ओळख असल्याचे सांगत प्रत्येक विद्यार्थ्याने ही मूल्ये जीवनात अंगीकारावीत, असे प्रतिपादन केले. अपयशाला न घाबरता ध्येयपूर्तीसाठी सातत्याने प्रयत्न करण्याची प्रेरणाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या विचारांचा प्रसार करून समाजहित आणि राष्ट्रहितासाठी कार्य करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास समन्वयिका डॉ. अनुराधा गोरे, उपप्राचार्या प्रा. निकिता बर्गे, प्रा. राव, प्रा. देवकर, प्रा. आवारे, प्रा. वैरागर, प्रा. विधाटे, प्रा. खेडकर, प्रा. गायकवाड, प्रा. अनिकेत आरसुळे, प्रा. रोडे, प्रा. पल्हारे, प्रा. कोल्हे, प्रा. भवर, प्रा. सोनवणे, प्रा. भोसले, प्रा. गुंड, प्रा. ढाकीफळे यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# 'सभासद हितालाच प्राधान्य; उपोषणाऐवजी चर्चेला या'

## शिक्षक बँकेच्या विरोधकांवर गुरुमाऊली सदिच्छा मंडळाचा पलटवार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पार्श्वभूमीवर गुरुमाऊली सदिच्छा मंडळाने विरोधकांच्या आंदोलनावर जोरदार पलटवार केला आहे. उपोषण करण्याऐवजी चर्चेला सहभागी व्हावे, असे आवाहन करत विरोधी गट केवळ प्रसिद्धीसाठी बँकेची बदनामी करीत असल्याचा आरोप माजी उपाध्यक्ष तथा राष्ट्रीय महिला आघाडीच्या अध्यक्षा विद्युलता आढाव यांनी केला.

पत्रकार परिषदेत बोलताना आढाव म्हणाल्या, शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांच्या नेतृत्वाखाली बँकेचा सभासदाभिमुख कारभार सुरू असून, गेल्या काही वर्षांत सभासदांना लाभांश आणि ठेवींवरील व्याजाच्या माध्यमातून यापूर्वीपेक्षा अधिक लाभ मिळाला आहे. यंदा संचालक मंडळाने ६.१० टक्के लाभांश देण्याची शिफारस केली असून, सभासदांच्या हितालाच सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे, असे त्यांनी सांगितले.



बँकेचा कर्जावरील व्याजदर राज्यातील पगारदार कर्मचाऱ्यांच्या सहकारी बँकांमध्ये सर्वात कमी असल्याचा दावा करत भविष्यात तो आणखी कमी करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कर्मचारी भरतीबाबतचे आरोप फेटाळून लावत, नियमित कर्मचाऱ्यांची संख्या कमी करण्यात आली असून आवश्यकतेनुसार मानधनावर कर्मचारी नियुक्त करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

महिला आघाडीच्या कार्यकारी अध्यक्षा वनिता सुंबे म्हणाल्या, वार्षिक सर्वसाधारण सभेतील विषयांवर निर्णय घेण्याचा अधिकार सभेलाच आहे. त्यामुळे विषयपत्रिकेतील मुद्द्यांवर उपोषण करणे योग्य नसून, सभेत प्रत्येक सभासदाला मत मांडण्याची संधी दिली जाते. सभेचा निर्णय संचालक मंडळावर बंधनकारक असतो, असेही त्यांनी सांगितले.

राज्य संपर्कप्रमुख मीनाक्षी अवचरे यांनी विरोधकांकडे ठोस मुद्दे नसल्यामुळे ते चर्चेला सामोरे जाणे टाळत असल्याचा आरोप केला. दरवर्षी वार्षिक सभेच्या वेळी वातावरण तापविण्याचा प्रयत्न केला जातो, अशी टीकाही त्यांनी केली.

नगर तालुकाध्यक्षा सुवर्णा भालसिंग यांनी, बँकेला शेड्युल बँकेचा दर्जा मिळाल्यास सभासदांना कमी व्याजदरात कर्जपुरवठा करणे शक्य होईल, असे सांगितले. रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार आवश्यक पोटनियम दुरुस्तीचा प्रस्ताव यंदाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा वृषाली कडलग, प्रतिभा राऊत, मीनाक्षी वाघचौरे, कांता बनकर, प्रतिभा साबळे, स्वाती झेंडे, दीपाली रेपाळ, नर्गीस इनामदार, आस्मा पटेल आदी उपस्थित होत्या. त्यांनी महिला सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

# निघोज स्मशानभूमीच्या सुशोभीकरणाला वेग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : श्री मळगंगा ग्रामीण विकास संस्थेच्या पुढाकारातून निघोज येथील स्मशानभूमीच्या दुरुस्ती व सुशोभीकरणाच्या कामाला वेग आला आहे. स्मशानभूमीत पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा शुभारंभ सोमवारी बाबासाहेब कवाद निघोज ग्रामीण पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात यांच्या हस्ते करण्यात आला. या कामामुळे स्मशानभूमी परिसर अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि सुविधायुक्त होणार आहे.

स्मशानभूमीतील पत्रा शेडमध्ये महिलांसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था करण्यात आली असून, पुढील टप्प्यात गरम पाण्याची सुविधा, स्वच्छतागृह, स्नानगृह, वृक्षारोपण तसेच इतर आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ही सर्व कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जातील, अशी माहिती देवस्थान ट्रस्टचे कार्याध्यक्ष वसंतराव कवाद यांनी दिली. या विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता असल्याने ग्रामस्थ, दानशूर व्यक्ती आणि समाजहिताची जाणीव असलेल्या नागरिकांनी स्मशानभूमी विकासासाठी सढळ हस्ते देणगी द्यावी, असे आवाहन उपकार्याध्यक्षा अमृता रसाळ यांनी केले. यावेळी कार्याध्यक्ष वसंतराव कवाद, उपकार्याध्यक्षा अमृता रसाळ, नामदेवराव थोरात, भिवाजी रसाळ, सुनील वराळ, ठकाराम लंके, शंकर लामखडे, रमेश ढवळे, रामदास ससाणे, अशोक वरखडे, ज्ञानेश्वर लंके, संदीप वराळ, महेशराव ढवळे, ग्रामपंचायत सदस्य गणेश कवाद, जीएलआर कन्स्ट्रक्शन कंपनीचे संचालक गणेश लामखडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अजिंक्य स्कूलमध्ये रंगली पंढरीची वारी; विठ्ठलनामाने परिसर दुमदुमला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पढेगाव** : आषाढी एकादशीच्या निमित्ताने पढेगाव येथील अजिंक्य इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये पंढरीची वारी उत्साहात साजरी करण्यात आली. वारकरी वेशभूषेतील विद्यार्थ्यांची दिंडी, टाळ-मृदुंगाचा निनाद, लेझीमचे तालबद्ध सादरीकरण आणि विठ्ठलनामाच्या अखंड गजराने संपूर्ण शाळा परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

विद्यार्थ्यांनी डोक्यावर तुळशी वृंदावन, हातात भगवे ध्वज घेऊन दिंडीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ''ज्ञानोबा-तुकाराम'' आणि ''विठ्ठल... विठ्ठल...''च्या जयघोषात दिंडीने परिसरात भक्तीचा जागर घडविला. विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्यासह विविध संतांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचे आकर्षक दर्शन घडविले. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले ते विद्यार्थ्यांनी सादर केलेले लेझीम. पारंपरिक पोशाखातील विद्यार्थ्यांच्या तालबद्ध सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. अभंग, भक्तिगीते आणि दिंडीमुळे शाळेचा परिसर जणू पंढरपूरच्या वारीचा अनुभव देत होता.



विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच महाराष्ट्राची संतपरंपरा, वारकरी संस्कृती आणि भारतीय संस्कारांची ओळख करून देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये भक्तिभाव, एकात्मता आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब तोरणे, उपाध्यक्षा शीला तोरणे, सचिव प्रदीप आहेर, करणजी नवले, मुख्याध्यापक अभिजीत खरात, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्कृतीची जपणूक

आधुनिक शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना संतपरंपरा, वारकरी संस्कृती आणि भारतीय मूल्यांची ओळख करून देणारे असे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे ठरत असल्याची भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केली.

# लिज पेंडन्सी असतानाही जमिनीचा व्यवहार?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : तालुक्यातील वालवड येथील गट क्रमांक १२६ मधील वडिलोपार्जित शेतजमिनीच्या व्यवहारात कथित बोगस खरेदीखत झाल्याचा आरोप समोर आला आहे. संबंधित जमिनीबाबत दिवाणी दावा न्यायालयात प्रलंबित असताना आणि लिज पेंडन्सीची नोंद असतानाही ७/१२ उताऱ्यात कथित फेरफार करून खरेदीखत नोंदविण्यात आल्याचा आरोप मालन हरिश्चंद्र मांडगे (रा. रेहेकुरी) यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी २३ जुलै रोजी कर्जत पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, वालवड येथील गट क्रमांक १२६ ही वडिलोपार्जित शेतजमीन असून, त्यासंदर्भातील रे.मु. क्र. ४८०/२०२४ हा दिवाणी दावा न्यायालयात प्रलंबित आहे. तसेच दस्त क्रमांक ८९५/२०२६ अन्वये संबंधित मिळकतीवर लिज पेंडन्सीची नोंद करण्यात आली आहे. असे असतानाही ७/१२ उताऱ्यातील इतर हक्कातील ठकुबाई गोविंद कर्पे यांचे नाव कथितपणे संपादित करून कमी करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणात खरेदीदार साहेबराव आहिलाजी पांडुळे, विक्रेते लक्ष्मण दामोदर कुटे, मंगेश दामोदर कुटे, छाया दशरथ रुके, संमतीदार दशरथ रुके, संबंधित गावकामगार तलाठी तसेच कर्जत येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी संगनमत करून कथित बेकायदेशीर खरेदीखत नोंदविल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

# वारकऱ्यांसाठी पन्हाळकर हॉस्पिटल सरसावले



**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : बोलावा विठ्ठल, पाहावा विठ्ठल,बकरावा विठ्ठल जीवभाव, या संतवाणीने दुमदुमलेल्या वातावरणात जामखेड तालुक्यातील धनेगाव येथील धाकटी पंढरी आषाढी एकादशीनिमित्त भक्तिरसात न्हाऊन निघाली. टाळ-मृदंगाचा निनाद, हरिनामाचा अखंड गजर, वीणेचे सूर आणि अभंगांच्या स्वरांनी संपूर्ण परिसर विठ्ठलमय झाला होता. शनिवारी (दि. २५) पहाटेपासून राज्याच्या विविध भागांतून आलेल्या हजारो भाविकांनी विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली. विविध भागांतून आलेल्या पायी दिंड्यांच्या आगमनामुळे धनेगावची धाकटी पंढरी वारकरी संप्रदायाच्या भक्तिरंगात रंगून गेली. महिला व पुरुष वारकऱ्यांनी पारंपरिक फुगड्या खेळत विठ्ठल नामाचा गजर केला. याच पार्श्वभूमीवर जामखेड येथील पन्हाळकर हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुशील पन्हाळकर यांच्या वतीने धनेगाव येथे आलेल्या हजारो भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले.


**CHANGE OF NAME**

I Have Change My Old Name

MISBA FAIZAL PATHAN

(BEFORE NAME)

To New Name As

MISBA RAJ INAMDAR

(AADHAR NO. 6199-5567-0523)

FORM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC

PLACE : SHRIRAMPUR

DATE : 27/07/2026


# राजीनामा झाला... पण विद्यार्थ्यांच्या मृत्यूचे उत्तर कोण देणार?

## नीट आंदोलनाने मिळवला विजय; मात्र शिक्षण व्यवस्थेतील मूलभूत त्रुटींवर उपायांची गरज कायम




### गुणांच्या शर्यतीत हरवले बालपण

गेल्या दोन दशकांत शिक्षणातील स्पर्धा इतकी तीव्र झाली की विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील खेळ, कला, संगीत, नाट्य, वाचन आणि छंद हळूहळू नाहीसे झाले. शाळांमध्ये खेळासाठी मर्यादित वेळ, तर उर्वरित वेळ परीक्षा आणि क्लासेसच्या तयारीत खर्च होऊ लागला.

### कोचिंग संस्कृतीचे वाढते दडपण

शालेय शिक्षणापेक्षा प्रवेश परीक्षांचे महत्त्व वाढले आणि त्याचबरोबर कोचिंग क्लासेसचे जाळे विस्तारले. सरकारी आणि खासगी शिक्षणातील दरी वाढत गेली. शिक्षणावरील खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेला. पालकांच्या अपेक्षा वाढल्या आणि विद्यार्थ्यांवर मानसिक दडपणही प्रचंड वाढले.

### बदलत्या जगाशी विसंगत शिक्षण

रोजगाराच्या संधी आणि उद्योगविश्वाच्या गरजा झपाट्याने बदलत असताना शिक्षण व्यवस्थेतील बदल मात्र अपेक्षित वेगाने झाले नाहीत. राष्ट्रीय शिक्षण धोरण जाहीर झाले; परंतु त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, पायाभूत सुविधा आणि आर्थिक तरतूद पुरेशी झाली नाही.

### राजीनाम्यापलीकडे जाऊन निर्णयाची गरज

जीवनात यशाइतकेच अपयशही असते, हे विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी शिक्षण व्यवस्थेची आहे. प्रत्येक विद्यार्थ्याचे सामर्थ्य वेगळे असते, प्रत्येकाचा यशाचा मार्गही वेगळा असतो, हा विश्वास समाजाने आणि पालकांनी निर्माण करणे आवश्यक आहे.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने देशभरातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला मोठे यश मिळाले. पेपरफुटी आणि नीट परीक्षेतील गोंधळाविरोधात उभ्या राहिलेल्या युवकांच्या संघर्षाची ही राजकीय परिणती मानली जात आहे. काही दिवस या घडामोडींवर चर्चा होईल, राजकीय आरोप-प्रत्यारोपही रंगतील. मात्र, या आंदोलनाने समाजासमोर उभा केलेला सर्वांत गंभीर प्रश्न मात्र कायम राहणार आहेनीट परीक्षेतील गोंधळामुळे नैराश्यात जाऊन आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या मृत्यूची जबाबदारी नेमकी कोणाची? आर्थिक मदत किंवा नुकसानभरपाईने पालकांचे दुःख कमी होणार नाही. गेलेली मुले परत येणार नाहीत. त्यामुळे हा विषय केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्याचा किंवा एका परीक्षेतील गैरव्यवहाराचा नसून, संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या पुनर्विचाराचा आहे.

आज नीट, जेईई आणि सीईटीसारख्या स्पर्धा परीक्षा अनेक विद्यार्थ्यांसाठी आयुष्याचा अंतिम टप्पा ठरत आहेत. यश मिळाले तरच आयुष्य सार्थक, अन्यथा सर्व काही संपल्याची भावना निर्माण होत आहे. ही मानसिकता निर्माण होण्यामागे केवळ विद्यार्थी जबाबदार नसून, कुटुंब, समाज आणि शिक्षण व्यवस्था यांचाही मोठा वाटा आहे. पराभव स्वीकारण्याची मानसिक ताकद, संघभावना, आनंदाने जगण्याची वृत्ती आणि संकटांचा सामना करण्याचे कौशल्य खेळ व कलांमधून विकसित होते. मात्र, गुणांच्या स्पर्धेने या मूल्यांना दुय्यम स्थान दिले. परिणामी, अपयश पचविण्याची क्षमता अनेक विद्यार्थ्यांमध्ये कमी होत गेली. त्यातच समाजमाध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष संवाद कमी झाला. एकटेपणा, नैराश्य आणि अपयशाची भीती अधिक तीव्र होत गेली.

कौशल्याधारित शिक्षणाची चर्चा झाली; पण प्रत्यक्षात पदवीधर युवकांमधील बेरोजगारी कमी झाली नाही. बाजारातील कौशल्यांची मागणी आणि शिक्षणातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांची तयारी यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली. त्याचा परिणाम वाढत्या नैराश्यात आणि आत्महत्यांमध्ये दिसून येत आहे.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला न्याय मिळाल्याची भावना निर्माण झाली असली, तरी खरी परीक्षा आता शासन, शिक्षणतज्ज्ञ आणि समाजाची आहे. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, समुपदेशन, खेळ-कला-छंदांना प्रोत्साहन, कौशल्याधारित शिक्षण आणि पारदर्शक परीक्षा व्यवस्था यासाठी ठोस पावले उचलली, तरच अशा आंदोलनांची आणि आत्महत्यांची पुनरावृत्ती टाळता येईल. एका मंत्र्याचा राजीनामा ही शेवट नसून, शिक्षण व्यवस्थेच्या व्यापक सुधारणेची सुरुवात ठरली, तरच या संघर्षाला खऱ्या अर्थाने यश मिळेल.

दैनिक

जनता आवाज

अहिल्यानगर, मंगळवार, दि.२८ जुलै २०२६, पान नं. ८


# बस प्रवासासाठी एनसीएमसी कार्ड ऐच्छिक

## आधार कार्ड तथा ओळखपत्र कार्ड ग्राह्य धरणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नाशिक** : एसटीचा प्रवास करताना काही महिन्यांपूर्वी आधार कार्डवर सवलतीचा प्रवास करताना कोणत्याही अडचणी येत नव्हत्या. मात्र, काही महिन्यांपूर्वी एसटी महामंडळाने एनसीएमसी कार्ड प्रवाशांसाठी आणले. परंतु, पुन्हा एकदा एसटी महामंडळाच्या मंत्र्यांनी एसटीच्या सवलतींसाठी एनसीएमसी कार्ड ऐच्छिक केले आहे. त्यामुळे पूर्वीप्रमाणेच आधार कार्ड किंवा कोणतेही ओळखपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे प्रवाशांची डोकेदुखी मात्र थांबणार आहे. काही महिन्यांपूर्वी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी आधार कार्ड किंवा साधे ओळखपत्र दाखवून निम्म्या तिकिटात प्रवास करणाऱ्या महिला आणि शंभर टक्के सवलतीचा आनंद घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना सवलतीच्या प्रवासासाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य केले होते. त्यामुळे या कार्डशिवाय सवलतीची लालपरी




गाठणे कठीण होणार होते. खिशात कार्ड नसेल तर प्रवासासाठी पैसे मोजावे लागणार होते. प्रवाशांना एनसीएमसी कार्डमुळे प्रवास अधिक सुलभ होणार असल्याचा दावा केला जात होता. असे असले तरी ग्रामीण भागातील चित्र मात्र वेगळे होते. रांगेत उभे राहून कार्ड काढणे, ते वेळेवर रिचार्ज करणे आणि तांत्रिक अडचणी हाताळणे, यामुळे ग्रामीण महिला व ज्येष्ठ प्रवाशांची मोठी ससेहोलपट झाली होती. आधार कार्डवर मिळणारी सवलत आता इतकी किचकट का केली, असा संतप्त सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात होता. परिवहनमंत्र्यांनी आपला निर्णय घेतला मागे घेतला आहे. आता परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी आपला निर्णय मागे घेतला असून, पूर्वीप्रमाणेच आधार कार्ड किंवा ओळखपत्राच्या आधारावर एसटीची सवलत मिळणार आहे.त्यासाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य नसून ऐच्छिक केले आहे. या निर्णयामुळे प्रवाशांची डोकेदुखी थांबणार आहे.

### पैसे परत करण्याची मागणी

परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी आधार कार्ड किंवा साधे ओळखपत्र दाखवून निम्म्या तिकिटात प्रवास करणाऱ्या महिला आणि शंभर टक्के सवलतीचा आनंद घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना सवलतीच्या प्रवासासाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य केले होते. त्यामुळे हे कार्ड काढण्यासाठी नागरिकांनी तासानतास रांगेत थांबून हे कार्ड काढले. या शिवाय २५० रुपयेही मोजले. आता महामंडळाने ह पैसे परत करण्याची मागणी केली आहे.

> एनसीएमसी कार्ड काढण्याची सध्या सक्ती नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे सद्यःस्थितीत आधार कार्ड किंवा ओळखपत्र हाच प्रवाशाचा पुरावा गृहीत धरला जाईल.
>
> – **लता मुळेवार**, आगारप्रमुख, वणी

# नेवासेत आरोग्यवर्धिनी समितीची बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : सार्वजनिक आरोग्य विभाग, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, पंचायत समिती नेवासा आणि ग्रामीण रुग्णालय नेवासा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती व तालुकास्तरीय संनियंत्रण –सल्लागार समितीच्या आढावा बैठकीस आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहून आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी त्यांनी नागरिकांना दर्जेदार, सुलभ व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे नमूद केले. माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, प्रत्येक आरोग्य संस्थेच्या कार्याचा नियमित आढावा, तसेच केंद्र व राज्य शासनाच्या सर्व आरोग्य योजनांचा लाभ तालुक्यातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा यासाठी सर्व संबंधित विभागांनी अधिक समन्वयाने व जबाबदारीने कार्य करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

याप्रसंगी नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, गटविकास अधिकारी संजय लखवाल, गटनेते महेश लोखंडे, नगरसेवक प्रविण शामराव सरोदे, नगरसेवक अनिल पवार, नगरसेवक संदीप सरकाळे, डॉ. मनिषा भाऊसाहेब वाघ, डॉ. निलेश शंकर लोखंडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामेश्वर काटे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भागवत दहीफळे, गटशिक्षणाधिकारी भागीनाथ बडे यांच्यासह पंचायत समिती सदस्य, आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




# २७ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : जिल्हा परिषद प्राथमिक अळकुटी केंद्र शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा निकालात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतील तब्बल २७ विद्यार्थी पात्र ठरले असून, या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी मोठी फी नाही, तर जिद्द, मेहनत आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन पुरेसे असते, हे जिल्हा परिषद प्राथमिक अळकुटी केंद्र शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या यशातून दाखवून दिले आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.




या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये वीर नितीन भंडारी (२४४ गुण), समीक्षा बाबुराव आवारी (२४२), वैष्णव नवनाथ भंडारी (२२०), अनुष्का मनसुख मोरे (२२०), कार्तिक रुपेश घोलप (२१६), शौर्य रमेश खोसे (२१४), अलअफजान मोहसीन मोमीन (२१०), शनया संतोष नन्हे (२०६), ओवी मुरलीधर कवडे (१९४), जोत्सना कुमारी (१९२), अथर्व वल्लभ पंडवाल (१९०), आलिया निजामुद्दीन मोमीन (१९०), सय्यक सचिन शिंदे (१८८) आणि विहान सुभाष थोरात (१८६) यांचा समावेश आहे.

सबा कमरअली शेख (१७८), ओवी सागर श्रीमंदीलकर (१६८), दुर्वा विक्रांत काजळे (१६८), सात्विक गौरक्ष पावडे (१६८), तृषा शिवाजी भंडारी (१६८), रूही आनंदराज शिरोळे (१६८), त्रिशेत रुपेश घोलप (१६४), अथर्व बबुशा शिंदे (१६०), पूर्वी बबुशा शिंदे (१५८), पुष्कर राहुल घोलप (१५६), गुडिया बुलेंट कुमार (१५२), आरूषी शंकर बेलकर (१५०) आणि मृण्मयी स्वप्नील आहाड (१२६) यांनीही यश मिळविले.

# कांद्याला मिळाला ३१०० रुपयांचा भाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : रविवारी राहाता बाजार समितीत कांदा आवक वाढली. कांद्याला प्रतिक्विंटल सर्वाधिक ३१०० रुपयांपर्यंत भाव मिळाला. डाळिंबाला प्रतिकिलोला २७५ रुपये भाव मिळाला. कांद्याची ८५५९ गोण्यांची आवक झाली. कांदा नंबर एकला २३०० ते ३१०० रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला. कांदा नंबर २ ला १३०० ते २२५० रूपये भाव मिळाला. कांदा नंबर ३ ला ५०० ते १२५० रुपये भाव मिळाला. गोल्टी कांदा ४०० ते १८०० रुपये. जोड कांदा ४०० ते ९०० रुपये प्रति क्विंटलला भाव मिळाला.



राहाता बाजार समितीत रविवारी डाळिंबाच्या ८४८६ कॅरेटची आवक झाली. डाळिंब नंबर १ ला १९१ ते २७५ रुपये प्रति किलोला भाव मिळाला. डाळिंब नंबर २ ला १०१ रुपये ते १९० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर ३ ला ६१ रुपये ते १०० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर ४ ला १० ते ६० रुपये भाव मिळाला. पेरूची २२ कॅरेट आवक झाली. पेरूला प्रतिकिलोला २० ते ३७ रुपये तर सरासरी ३० रुपये भाव मिळाला, अशी माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.

# अकोलेत महिलेवर बिबट्याचा हल्ला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : अकोले तालुक्यातील प्रवरा खोऱ्यातील सुगाव खुर्द येथे सकाळच्या सत्रात भरदिवसा बिबट्याने धुडगूस घातला. शेतात चारा काढण्यासाठी गेलेल्या एका शेतकरी महिलेवर बिबट्याने अचानक झडप घालून तिला गंभीर जखमी केल्याने परिसरात खळबळ उडाली असून ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुगाव खुर्द शिवारातील वस्तीवर वास्तव्यास असलेल्या शेतकरी महिला कविता



बाळासाहेब वैद्य या सकाळी १० वाजण्याच्या सुमारास पशुधनासाठी चारा काढण्यासाठी घराजवळील शेतात गेल्या होत्या. त्याचवेळी शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. बिबट्याने त्यांच्या उजव्या हातावर नखांनी वार करून गंभीर जखमा केल्या. बिबट्याच्या हल्ल्याने घाबरलेल्या कविता वैद्य यांनी मोठ्याने आरडा–ओरड केली. त्यांचा आवाज ऐकून त्यांचे पती बाळासाहेब वैद्य यांनी शेताकडे धाव घेतली. बाळासाहेब वैद्य घटनास्थळी धावून येताच बिबट्याने तेथून पळ काढला. जखमी कविता वैद्य यांच्यावर प्रथम सुगाव खुर्द ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना संगमनेर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

### तातडीने लावला पिंजरा

घटनेची माहिती मिळताच वनरक्षक तांबे, वनमजूर बबन झोळेकर आणि सोमनाथ पथवे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. तसेच बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनविभागाने तातडीने पिंजरा लावून परिसरावर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे.

# नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध

## माजी खासदार आढळराव पाटील; लोकसभा निवडणुक लढविणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरूर** : आगामी शिरूर लोकसभा निवडणूक लढणार असून,मागील काही वर्षांत शिरूर लोकसभा मतदारसंघात ६०० कोटी रुपयांहून अधिक विकासकामे मार्गी लावली असून विकास कामे व नागरिकांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे पुणे म्हाडाचे अध्यक्ष तथा माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी सांगितले.

शिरूर येथे आयोजीत पत्रकार परिषदेत माहिती सांगताना माजी खासदार आढळराव पाटील बोलत होते. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल पाचर्णे, पंचायत समितीचे उपसभापती रामभाऊ



सासवडे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अनिल काशिद,नगरसेविका पूजा पोटावळे, नगरसेवक सागर नरवडे,उमेश शेळके, संतोष थेऊरकर, दिनेश मांडगे,निलेश पवार, माजी नगरसेवक विठ्ठल पवार उपस्थित होते.

पुणे–शिरूर रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे तसेच नाशिक फाटाराजगुरूनगर महामार्गाच्या कामाचा कार्यादेश लवकर काढावा, अशी मागणी त्यांनी केली.

गेल्या पाच वर्षांत चाकण, आळंदी, जुन्नर, राजगुरूनगर, शिरूर आणि मंचर येथील नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करून विविध विकासकामे मार्गी लावण्यात आली. नागरिकांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देत विकासाची गती कायम ठेवण्याचा प्रयत्न केला असून सलग दोन टर्म खासदार राहिलेल्या लोकप्रतिनिधींनी आपल्या कार्यकाळातील विकासकामांचा हिशोब जनतेसमोर मांडावा, असे आव्हान म्हाडाचे अध्यक्ष तथा माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केले.

# त्रिमूर्ती विद्यालयात बाल दिंडी सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा फाटा** : त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित, त्रिमूर्ती प्राथमिक विद्यालय त्रिमूर्ती नगर येथील चिमुकल्या वारकऱ्यांची बाल दिंडी मोठ्या भक्ती भावाने काढण्यात आली.

विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा धारण केली होती डोक्यात टोपी,कपाळी गंध, गळ्यात तुळशीची माळ आणि गळ्यात टाळ तर मुलींनी पारंपरिक नऊवारी साडी परिधान केली होती. डोक्यावर तुळस होती.

हातात चिपळ्या झांज, भगवे झेंडे आणि तोंडात ''ज्ञानोबा तुकाराम'', विठ्ठल माझा माझा, या जयघोषाने संपूर्ण परिसर



भक्तीमय झाला होता. श्री विठ्ठलाच्या वेशभूषातील संचिता देवडे तर रुक्मिणीच्या वेशातील तेजस्विनी पठाडे यांनी सर्वांचे लक्ष वेधले होते. त्यामध्ये नैतिक विधाटे याने रामदास स्वामी, श्रेया निकाळजे हिने चोखामेळा, अभिषेक जोंधळे याने संत एकनाथ, सानवी मगर हिने मुक्ताई व संत तुकारामाची भूमिका प्रत्यूष वनवे याने साकारली.

संस्थेच्या अध्यक्षा ॲड सुमती घाडगेपाटील यांनीही गळ्यात टाळ घेऊन वारकरी देशातील विद्यार्थ्यांनी केलेल्या रिंगणात सहभाग घेतला.ठिकठिकाणी या सर्व बालगोपालांच्या दिंडीवर फुलांचा वर्षाव करण्यात आला. त्यानंतर पैस मंदिरामध्ये गणपती, दत्तात्रय भगवान,संत ज्ञानेश्वर आणि विठ्ठलाच्या आरतीने या दिंडी सोहळ्याची सांगता करण्यात आली यामध्ये त्रिमूर्ती प्राथमिक विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांनी मोठ्या आनंदाने सहभाग घेतला होता. सर्वांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक योगेश भवर यांनी आभार मानले.

# वाटापुरात आधार कार्ड शिबिर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त बॅनरबाजी टाळून भारतीय जनता युवा मोर्चाचे अहिल्यानगर



उत्तर जिल्हा उपाध्यक्ष महेश पवार यांच्या पुढाकाराने वाटापूर येथे मोफत आधार सेवा व एनसीएमसी कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात नवीन आधार कार्ड काढणे, तसेच आधार कार्डमधील आवश्यक दुरुस्तीची कामे करण्यात आली.

यावेळी एसटी प्रवासातील विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले एनसीएमसी कार्ड थेट गावातच उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत आणि महिलांना प्रवासातील ५० टक्के सवलतीचा लाभ मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. ग्रामस्थांचा वेळ व पैसा वाचावा या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे वाटापूरकरांनी स्वागत केले. यावेळी सरपंच रावसाहेब कदम, भाजयुमोचे जिल्हा उपाध्यक्ष महेश पवार, ग्रामस्थ व लाभार्थी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केडगावात शिवणकाम प्रशिक्षण केंद्राचे उद्‌घाटन

## महिला उद्योजकतेला नवे बळ; रोजगार मेळाव्यास प्रतिसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने केडगाव येथे 'अहिल्या महिला उद्योजकता विकास' अधिकृत लघुउद्योग शिवणकाम केंद्राचे उद्घाटन उत्साहात पार पडले. याचवेळी आयोजित करण्यात आलेल्या महिला रोजगार मेळाव्यास परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमामुळे महिलांना घरबसल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, त्यांना प्रशिक्षणासह कायमस्वरूपी



उत्पन्नाचा मार्ग खुला होणार आहे. महिला उद्योजकता विकास अभियानांतर्गत सेवाभावी प्रबोधन समिती, कल्याणी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, रोजगार निर्मिती अभियान आणि संजीवन उद्योग समूह यांच्या संयुक्त विद्यमाने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे.

या शिवणकाम केंद्रात महिलांकडून विविध आकारांच्या गोधड्या, साध्या व फॅन्सी कुर्त्या, रेशीम कुर्ते, पायजमे तसेच इतर वस्त्रनिर्मिती केली जाणार आहे. उत्पादनासाठी आवश्यक कच्चा माल उपलब्ध करून देण्याबरोबरच तयार मालाची खरेदी संस्थेकडून करण्यात येणार असून, त्याचा मोबदला थेट महिलांना दिला जाणार आहे. त्यामुळे महिलांना बाजारपेठेची चिंता न करता रोजगाराची संधी मिळणार आहे.

या उद्घाटन सोहळ्याला नगरसेवक विजय पठारे, उद्योजक संदीप देशमुख, सेवाभावी प्रबोधन समितीचे अध्यक्ष तथा कल्याणी महिला बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा व कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शिका डॉ. सुनीताताई मोडक, संजीवन उद्योग समूहाचे संदीप फुंदे, कार्यकारी अधिकारी प्रशांत लोणारी, केडगाव शिवणकाम केंद्राच्या अध्यक्षा मोनिका कुसळकर, रविंद्र कुसळकर यांच्यासह परिसरातील अनेक महिला उपस्थित होत्या.

प्रास्ताविकात उद्योजक संदीप फुंदे यांनी या अभियानाची व्यापक माहिती देताना सांगितले की, संपूर्ण महाराष्ट्रात ४ हजार शिवणकाम केंद्रे स्थापन करून एक लाख महिलांना कायमस्वरूपी स्वाभिमानाचा रोजगार उपलब्ध करून देणे हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

### जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश

प्रमुख मार्गदर्शिका डॉ. सुनीताताई मोडक यांनी महिलांना आत्मविश्वास, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर उद्योग–व्यवसायात यशस्वी होता येते, असे सांगितले. व्यवसाय सुरू करताना येणाऱ्या अडचणींना न घाबरता सातत्याने प्रयत्न करण्याचा सल्ला त्यांनी दिला. कुटुंबाची जबाबदारी सांभाळत महाराष्ट्रभर उभारलेल्या उद्योग–व्यवसायाचा आणि सामाजिक कार्याचा स्वतःचा प्रवास त्यांनी उपस्थितांसमोर उलगडला. तसेच ज्येष्ठ समाजसेविका सिंधूताई सपकाळ यांच्या सहवासातून प्रेरणा मिळाल्याचे सांगत सामाजिक बांधिलकीचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.


हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ RNI No. MAHMAR/2022/85155. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028, RNI No. MAHMAR/2022/85155.